|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ४६ सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. ३० नोव्हेंबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## संपत्ती समोर कसली नाती कसला संसार मुलांच्या मदतीने पत्नीने केले पतीला ठार



मिरा-भाईंदर : क्राईम रिपोर्टर



**आजकाल या जगात कोण कोणाचा नाही. प्रत्येकाला स्वतःची फिकीर असते. त्यामुळे कुटुंबाच्या मालमत्तेच्या वादात अनेक वेळा रक्ताच्या नेत्यांचाही बळी गेलेला आहे. पैशांसमोर नाती गोती सर्व काही फिकी असतात. जेंव्हा वाद होतात तेंव्हा त्या कुटुंबातील माणूस स्वतःला काय आणि कसे मिळेल याचा विचार करतो अशावेळी त्याच्या मार्गात जर कुणी आल तर तो कुणाचाही विचार करीत नाही आणि रक्ताच्या नात्याची होऊन आपल्याच नात्यातील माणसाचा जीव घेण्यास प्रवृत्त होतात. भाईंदरमध्ये प्रॉपर्टीच्या वादातून एका महिलेने आपल्या दोन मुलांच्या मदतीने पतीची हत्या केली असून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. आरोपी मुलांपैकी एक अल्पवयीन आहे.**

मालमत्तेच्या वादातून पत्नी आणि दोन मुलांनी एका सोने व्यापाऱ्याची हत्या केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. भाईंदरच्या सोनल पार्क परिसरात राहणारे सुशांतू पॉल, सोने कारखाना चालवत होते. मध्यरात्री कारखान्यात त्यांच्या डोक्यावर गंभीर वार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. घटनेनंतर आरोपी पसार झाले होते. स्थानिकांच्या सतर्कतेनंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान पॉल यांचे कुटुंबीय गायब असल्याने पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला होता. दरम्यान, दिवा परिसरात पॉल यांच्या दोन मुलांसह पत्नी लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून तिघांना अटक करण्यात आली. प्राथमिक चौकशीत मालमत्तेच्या वादातून हत्या केल्याची कबुली त्यांनी दिली असल्याचे समोर ...पान २ वर



# अल्पवयीन मुलीवरील बलात्कारी आरोपी सात महिन्यांपासून फरार बेफिकीर मुख्यमंत्र्यांमुळे महिलांच्या अब्रुचे सौदागर बनलेत ठाणेदार






पोलीस अधिक्षक अमोल तांबे

लातूर : राम पाटोळे

**महिलांवरील वाढत्या अत्याचारामुळे देशभर महाराष्ट्राची बदनामी होत आहे. पण गृहखाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस हे मात्र वेगवेगळ्या पक्षातील फुटीरांच्या मदतीने बनवलेले महायुती सरकार सांभाळण्याच्या अवघड कसरतीत गुंतलेले आहेत. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. परिणामी 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीनुसार गृहमंत्रीच महिलांच्या सुरक्षेबाबत फारसे गंभीर नसतील तर पोलिसांना तरी काय घेणे देणे आहे. आणि यामुळेच महाराष्ट्रातील महिलांवरील अत्याचार थांबताना दिसत नाहीत. पण मुख्यमंत्री मात्र आमच्या सत्ता काळात महिलांवरील ५१ टक्के गुन्ह्यात कारवाई झाल्याचे सांगून आपली पाठ थोपटून घेत आहेत. याच फडणवीसांनी भर विधानसभेत सांगितले होते कि महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत पोलिसांनी हलगर्जीपणा केला, तर त्यांच्यावर कठोर कारवाई करू. असे असताना लातूरमध्ये एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी अजून पर्यंत गुन्हा दाखल करण्याच्या पलीकडे काहीही केले नाही. त्यामुळे पोलिसांनी पैसे खाऊन हे प्रकरण दाबले असा आरोप लातूरकर करीत आहेत. कारण या प्रकरणात सुरुवातीपासूनच लातूरच्या एमआयडीसी पोलिसांची भूमिका संशयास्पद होती. ३ मे २०२५ रोजी बाळू ढोबळे याने मुलीचे अपहरण केले आणि ८ मे रोजी मुलीला सोडले. या कालावधीत त्याने अनेक वेळा त्या मुलीवर लैंगिक अत्याचार केले. मुलगी घरी आल्यानंतर तिने घडलेला प्रकार पालकांना सांगितला. पालकांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. प्रकरण अत्यंत गंभीर असतानाही पोलिसांनी या प्रकरणी तात्काळ आरोपीला शोधण्याची तसदी घेतली नाही. केवळ बाळू ढोकळे त्याचे वडील गौतम ढोकळे, आई वंदना ढोकळे व भाऊ आदेश ढोकळे यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले. पण आरोपींना अटक करण्यात आली नाही. अपहरण आणि बलात्कार यासारखे गंभीर गुन्हे त्यातच पॉस्को लावण्यात आलेल्या गुन्ह्यात जर आरोपीला ७ महिने अटक होत नसेल तर पोलीस काय झोप काढीत आहेत. आरोपीचे लग्न जुळले आहे याची माहिती पोलिसांना मिळते, पण आरोपी पोलिसांना मिळत नाही हे कोणालाही पटणार नाही. त्यामुळे आरोपीला वाचवण्यासाठी पोलिसांनी पैसे खाल्ले असा आरोप लातूरकर करीत आहेत. प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने या प्रकरणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या सह एमआयडीसी पोलिसांची चौकशी करून या सर्वांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी लातूरकरांनी केली आहे.**

लातूर शहरातील एमआयडीसी भागातील राहणाऱ्या एका कुटूबांतील एक अल्पवयीन मुलगी ३ मे २०२५ ते ४ में २०२५ च्या पाहटे अचानक बेपत्ता झाली होती. बरेच तास उलटूनही आल्पवयीन मुलगी घरी आली नसल्याने आई-वडीलांना चिंता वाटू लागली. आई-वडीलांनी तिचा सर्वत्र शोध घेण्यास सुरुवात केली. नातेवाईक, इकडे-तिकडे सगळीकडे फोन लावून विचारणा केली मात्र ती कुठेही आढळून आली नाही. त्यामुळे आई-वडीलांनी एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंघाने पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. दरम्यान ८ मे रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन मुलगी तिचे आई-वडील राहत असलेल्या घराच्या गेटमधून घराकडे येत असल्याची दिसली. ती पूर्णतः भयभीत दिसत होती. तिला आई-वडीलांनी तू कुठे गेली होतीस अशी विचारणा केली तेव्हा ती काही एक बोलण्यास तयार नव्हती. तेंव्हा तीच्या आई-वडीलांनी तीला सोबत घेत एमआयडीसी पोलिस ठाणे गाठून तिला पोलिसासमोर उभे केले. तेंव्हा तपास कर्मचारी बिराजदार आणी पीएसआय प्रशांतसिंह राजपुत यांनी अल्पवयीन मुलीचा जबाब घेत मुलीच्या आई-वडीलांना, चुलत्याला धक्के मारून बाहेर काढत तुमचे काम झाले निघा येथून आसा दम भरला. मात्र आई-वडीलांना आपल्या मुलीसोबत काहीतरी विपरीत घडल्याची शंका आल्याने त्यांनी आपल्या अल्पवयीन मुलीचा ताबा घेण्यास नकार दिला. तेंव्हा पोलिसांनी अल्पवयीन मुलीची महिला आधार केंद्रात रवानगी केली. अधार केंद्रात आईने तिच्यासोबत एकांतात बातचित करत विश्वासात घेऊन विचारल्या असता तिने आपल्या पिकप गाडीवरील ड्रायव्हर बाळू ढोबळे व त्याच्या दोन मित्रांनी मला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्याची माहिती आई-वडीलांना दिली. बाळू ढोबळे हा अल्पवयीन मुलीली एका मोटरसायकलीवर बसवून येडशी येथे घेऊन गेला. तेव्हा त्याच्यासोबत अन्य एका ...पान २ वर

## अनैतिक संबंधामुळे प्रियकराचा घात झाला बहिणीच्या 'लव्ह स्टोरी'चा भावांनी शेवट केला





कर्नाटक (बिदर) : क्राईम रिपोर्टर

**प्रत्येक माणसाला आपल्या इज्जत प्यारी असते. त्यामुळे कुटुंबातील महिलांनी त्यांच्या मर्यादेत राहावे असे घरातील पुरुष मंडळींचे म्हणणे असते. पण आजकाल व्याभिचार वाढलेला आहे. त्यामुळे विधवा किंवा घटस्फोटीत बाई जरी माहेरी सुखात असली तरी तिला ते सुख मिळत नाही, अशावेळी ती एखाद्याच्या प्रेमात पडली तर माहेरच्यांनी किती जरी दबाव टाकला तरी ती आपल्या प्रियकराला सोडू शकत नाही. बिल्डर जिल्ह्याच्या नागनपल्ली गावात राहणारी पूजा ही दोन मुलांची आई होती, पण नवऱ्याला सोडून माहेरी राहत होती. याच दरम्यान तिचे विष्णू नावाच्या इसमाशी अनैतिक संबंध जुळले आणि ती विष्णूसोबत राहू लागले, मात्र हे पूजाच्या दोन्ही तसेच इतर नातेवाईकांना पटत नव्हते. कारण समाजात त्यांची बदनामी होत होती. सुरुवातीला तिच्या भवानी विष्णू व पूजाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण दोघेही ऐकत नव्हते. अखेर संतापलेल्या पूजाच्या भवानी विष्णूची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**

२७ वर्षीय विष्णु हा महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयातील गौनागाव येथील असून तो कर्नाटकातील बिदर जिल्हयातील नागनपल्ली येथे राहयला आहे. येथे तो मोलमजुरी करीत असताना त्याचे पुजा नावाच्या महिलेशी अनैतिक संबंध जुळले. पुजा ही आधीच विवाहित ...पान २ वर

## म्हातारा नवरा पण संशयी फार दगडाने ठेचून पत्नीला केले ठार

मुंबई : क्राईम रिपोर्टर



**पती पत्नीचे नाते भलेही विश्वासाच्या पायावर उभे असले तरी लग्नानंतर हळूहळू या नात्याला तडे जातात आणि त्याची करणेही वेगवेगळी असतात. काही पती संशयी असतात. खास करून ज्या विवाहिता सुंदर असतात त्यांचे पती संशयी असतात आणि याच संशयातून पुढे संसार उध्वस्त होतो. काही लोक तर उतार वयातही पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ करीत असतात. मुंबईच्या मालाड मालवणी भागातील सिराज नाईक हा वयाच्या ५६ व्या वर्षीही पत्नीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा, यातून दोघांची भांडणे व्हायची आणि याच भांडणातून सिराजने पत्नीची दगडाने ठेचून हत्या केली आणि पोलिसांच्या स्वाधीन झाला.**

मुंबईच्या मालाड मालवणी परिसरात पतीने पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पत्नीच्या चरित्र्याच्या संशयावरून पतीने दगडाने ठेचून पत्नीची हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. मालवणी कच्च्या रोड आडवा पट्टा जवळ ही धक्कादायक घटना घडली आहे. पतीने पत्नीची हत्या करून मालवणी पोलिसांकडे सरेंडर केलं. अटक आरोपीचे नाव सिराज नाईक ...पान २ वर

## जमिनीचा वाद अखेर प्राणावर बेतला धाकट्याने थोरल्या भावाचा जीव घेतला





मयत संजय पाटील

बेळगावी (हुक्केरी) : क्राईम रिपोर्टर

**जमिनीचे वाद लवकर सोडवले नाही तर त्यातून कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो. बेळगावी जिल्ह्याच्या कुरणी येथील संजय पाटील व राकेश पाटील या दोन सख्ख्या भावांमध्ये जमिनीच्या वाटणीवरून वाद होता. मात्र दोघांच्या आई वडिलांना हा वाद मिटवण्यात अपयशाचे रूपांतर सूडाच्या झाले आणि एके दिवशी राकेश याने आपल्या एका नातेवाईकाच्या मदतीने उसाच्या शेतातच भावाची हत्या केली. तसेच ती हत्या नसून एक अपघात होता असे भासवण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी सत्य शोधून काढले आणि आरोपी राकेश व त्याच्या नातेवाईकाला अटक केली.**

हुक्केरी तालुक्यातील कुरणी संजय महादेव पाटील आणि त्याचा भाऊ राकेश महादेव पाटील हे दोघे आपल्या वाड वडिलार्जीत घरात आपआपल्या कुटूंबासह राहयला आहेत. त्याची थोडी फार शेती असल्याने त्यावरच त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असतोत्याचे आई-वडिल ही दोन्ही मुलांची होत असलेली भांडणे बघून वेगळेच राहत होते. यातूनच ...पान २ वर

## अनेक वेळा समजावून हरीने नाही ऐकले भारतने त्याला ठार मारून विहिरीत फेकले



नाशिक : क्राईम रिपोर्टर

**मित्र किंवा नातेवाईक किती जरी जवळचा असला तरी त्याच्यावर डोळे झाकून विश्वास टाकू नये. याचे मुख्य कारण कधी कधी आपण एखाद्याला आपल्या घरापर्यंत आणतो आणि तो माणूस नंतर चुलीपर्यंत जातो. असाच काहीसा प्रकार नाशिक जिल्ह्याच्या शिवनाईमध्ये घडला. किलबिले हे दोघे नातेवाईक कामानिमित्त शिवणी येथे राहत होते. पण हरीची भारत याच्या बायकोवर वाईट नजर होती, तो तिची छेडछाड करायचास भारतला हा प्रकार समजताच त्याने अगोदर हरीला समजावण्याचा प्रयत्न केला. पण हरी काही ऐकत नव्हता. अखेर भारतने टोकाचा निर्णय घेऊन हरीची हत्या केली आणि त्याचा मृतदेह विहिरीत फेकला. मात्र या खुनाला वाचा फुटली आणि पोलिसांनी आरोपी भारत याला अटक केली.** ...पान ६ वर

## पाण्यावरून झालेला वाद भयंकर पेटला संतप्त महिलेने शेजाऱ्याचा जीव घेतला








विरार : क्राईम रिपोर्टर

**वसई-विरार पट्ट्यातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने येथे नागरी सुविधांचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. खास करून पिण्याच्या पाण्याचा पाण्याचा प्रश्न जास्त गंभीर बनलाय. पाणी टंचाई विरुद्ध वसई विरार मधील जनतेने अनेक वेळा महापालिकेवर मोर्चेही काढले, पण हा प्रश्न सुटू शकला नाही. त्यामुळे पाण्यावरून लोकांची रोज भांडणे होतात आणि याच भांडणातून पुढे हाणामारीचे प्रसंग उद्भवतात. पण आता तर पाण्यावरून होणारे वाद इतके विकोपाला गेलेत कि याच वादातून एका महिलेने शेजाऱ्याच्या तोंडावर डास मारण्याचा स्प्रे फवारल्याने शेजाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी महिलेला पोलिसांनी अटक केली आहे.**

वसई विरारमध्ये पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर बनत चालला असताना. विरार येथील एका गृहसंकुलातून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. या घटनेत पाणी भरण्यावरुन दोन शेजाऱ्यांमध्ये वाद झाला होता. पण, काही वेळात हा वाद इतका विकोपाला पोहोचला कि इमारतीतील महिलेने रागाच्याभरात आपल्या शेजाऱ्याची हत्या केली. विरार पश्चिम येथे जेपी नगर परिसर आहे. या परिसरातील १५ क्रमांकाच्या इमारतीत उमेश पवार (५३) आणि कुंदा तुपेकर (४७) यांची कुटुंब वास्तव्यास आहेत. या दोन्ही कुटुंबांमध्ये गेल्या कित्येक दिवसांपासून पाणी भरण्यावरून वाद सुरू होता. अशातच मंगळवारी रात्री उमेश पवार (५३) आणि कुंदा तुपेकर (४७) यांच्यात ...पान २ वर

## गुन्हेगारांशी अनैतिक संबंध ठेवून फसली सुवर्णा आपला जीव गमावून बसली



पुणे : क्राईम रिपोर्टर

**गुन्हेगारांशी संबंध ठेवणे म्हणजे असंगाशी संग अशातला प्रकार असतो. पण काही बायका पैशांसाठी आणि शरीर सुखासाठी इतक्या आसुसलेल्या असतात कि त्यांना फक्त त्यांची गरज भागवणारा पुरुष पाहिजे असतो. मग तो कुणीही असो. येरवडा परिसरात राहणार व पत्नीच्या खून प्रकरणात जामिनावर सुटून आलेला रवी साबळे हा कुख्यात गुन्हेगार होता. त्याच्यावर २० गंभीर गुन्हे दाखल होते आणि अशा माणसाला सुवर्णाने जवळ केले होते. तसे तिलाही पतीला सोडलेले होते.** ...पान ६ वर

24 TO 30 NOVEMER 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/22/2025 8:47 PM Page 1



पान १ वरून...

## अल्पवयीन मुलीवरील बलात्कारी...

दुचाकी वर त्याचे दोन मित्र होते. त्यांनी बाळू ढोबळे व अल्पवयीन मुलीला येडशी येथे सोडले. त्यानंतर बाळू ढोबळे यांने अल्पवयीन मुलीला एका ऑटोतून उस्मानाबाद येथे नेले व तिथून पुणे येथे नेले. पुण्यात बाळू ढोबळी याची बहिण राहत असलेल्या ठिकाणी बाळू ढोबळे हा अल्पवयीन तरूणीला घेवून आला. पुण्यातील एका सराफ दुकानातून मंगळसूत्र, जोडवे खरेदी केले. आपण लवकरच लग्न करू अशी आमिष अल्पवयीन तरूणीला दाखवली. त्या रात्री बाळू ढोबळे याची बहीण व भाऊजी घराच्या बाहेर झोपले. तर अल्पवयीन मुलगी आणि बाळू ढोबळे घरात झोपले. त्या रात्री बाळू ढोबळे यांने अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली. याला अल्पवयीन मुलीने विरोध करताच तुझ्या भावाला आणि कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक संबध प्रस्थिपीत करत अत्याचार केला. सलग दोन दिवस हा लैंगिक अत्याचार सुरू होता. त्यानंतर बाळू ढोबळे यांचे आई-वडील पुणे येथे आले व त्यांनी पिडीत मुलीस एका खाजगी वाहनातून ८ मे रोजी सकाळी लातूरात आणून सोडले. त्यानंतर बाळू ढोबळे यांच्या आई-वडीलांनी आल्पवयीन मुलीा तु माझ्या मुलाचे नाव घेतल्यास तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. तु तुझ्या मर्जीने गेले होते असे सांग असाही दम भरला. दरम्यान पिडीतिच्या नातेवाईकांनी या प्रकरणातील आरोपी बाळू उर्फ आदित्य गौतम ढोबळे याचे लग्न याच महिन्यात असल्याची माहिती देखील पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी उलट पीडितेच्या नातेवाईकांना तुम्हाला काय करायचे आहे आम्ही बघून घेतो असं म्हणत समज दिला. ४ मे २०२५ रोजी पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये गुरनं ३६९/२०२५ कलम १३७ (२) बीएनएस २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान १६ में २०२५ रोजी अपहरित मुलीचा जबाब नोंद करून या गुन्ह्यात बाळू उर्फ अदीत्य गौतम ढोबळे, गौतम तात्याराव ढोबळे (५५), वंदना गौतम ढोबळे (४९) व आदेश गौतम ढोबळे (२६) रा. झोपडपट्टी बर्दापूर ता. आंबाजोगाई जि. बीड याच्या विरोधात कलम ६४(२), (आय) बीएनएस २०२३ व सह कलम ४,८ व १२ पोक्सो ॲक्ट २०१२ प्रमाणे कलमाची वाढ करण्यात आली. मात्र आज पर्यंत एमआयडीसी पोलीसाकडून या प्रकरणात आरोपी असलेल्या बाळू उर्फ आदित्य गौतम ढोबळे, (२४), गौतम तात्याराव ढोबळे, (५५) वंदना गौतम ढोबळे (४९) व आदेश गौतम ढोबळे (२६) राहणार झोपडपट्टी बर्दापूर तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड यांच्यावर कुठलीच कारवाई करण्यात आली नाही. अश्चर्याची बाब म्हणजे जेव्हा जेव्हा पिडीतिचे आई वडील आरोपीच्या अटके संदर्भात पोलीस ठाण्यात विचारणा करतात तेंव्हा पोलिसच त्यांना आरोपीचा मागमुस तुम्हाला माहीत आहे का आम्हाला सांगा आम्ही अटक करतो असा सवाल उपस्थित करतात. दरम्यान या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांतसिंह रघुनाथसिंह राजपूत यांच्याकडे देण्यात आला होता. या प्रकरणाच्या तपासात प्रशांतसिंह राजपूत यांनी दिरंगाई करत हे प्रकरण चौकाशीवर असल्याची माहिती पीडित कुटुंबाच्या नातेवाईकांना दिली. दरम्यानच्या काळात २८ मे २०२५ रोजी प्रशांतसिंह रघुनाथसिंह राजपूत यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली मात्र या सापळ्यातून पीएसआय प्रशांतसिंह राजपूत निसटले आणि फरार झाले. त्यामुळे या प्रकरणाचा सर्व तपास त्यांच्या कपाटात बंद असल्याची माहिती पिडीतांना देण्यात आली. दरम्यानच्या काळात तत्कालीन पोलिस निरीक्षक सुधाकर देडे यांची बदली झाली. व त्यांच्या रिक्त जागी पोलिस निरीक्षक समाधान चवरे यांनी चार्ज घेतला. त्यावेळी पिडीतेच्या कुटूंबियांनी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी समाधान चौरे यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणाविषयी माहिती देवून न्यायाची मागणी केली. मात्र त्यांनीही पीडित मुलीच्या कुटुंबीयांची समजूत काढून पीएसआय प्रशांतसिंह राजपूत यांच्यावर झालेल्या कारवाईमुळे त्यांच्या कपाटाला कुलुप आहे. त्यांचे कुलूप आम्ही तोडू शकत नाही. कायदेशिर कारवाही करून त्यांचे कपाट उघडुन व तुम्हाला योग्य न्याय देवू असे अश्वासन दिले. गेल्या दोन महिन्यानंतर या गुन्ह्यांचा तपास सपोनि ज्ञानदेव सानप यांच्या हाती देण्यात आला. मात्र सपोनि ज्ञानदेव सानप यांनी या प्रकरणातील आरोपी शोधण्याची तसदी घेतली नाही. उलट आरोपींचे नातेवाईक आम्हाला शिवीगाळ करत आसल्याचे पिडीत कुटूबियांना सांगितले. यावरून असेच दिसते की एमआयडीसी पोलिसांना मुळात आरोपीला पकडाच नाही. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी जिल्हाभरातील सर्वच पोलीस ठाण्याला प्रलंबित गुन्हे निकाली काढताना फरार आरोपीची शोध मोहीम हाती घेतली. त्या अनुषंगाने जिल्हाभरातील बऱ्याच पोलीस ठाण्यांनी आपले कौशल्य पणाला लावून आधुनिक माहीती आणी तंत्रज्ञानाचा आधार घेत गेल्या ३० ते ४० वर्षापासून फरार असलेल्या आरोपींचा शोध घेऊन त्यांना गजाआड करत उल्लेखनीय कामगिरी केली. असे असाताना मात्र एमआयडीसी पोलिसांच्या नाकावरती टिच्चून बेधाकपणे वावरणारा आरोपी अद्याप एमआयडीसी पोलिसांना सापडत नाही ही पोलिसांची अकार्यक्षमता आहे का आर्थीक व्यवाहाराचा मंदीपणा हे न कळणार कोड आहे.

## संपत्ती समोर कसली नाती कसला ...

आले आहे. यातील धाकटा मुलगा अल्पवयीन आहे, तर पत्नी आणि मोठ्या मुलाची कसून चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. भाईंदर पूर्वेला सुशांतू पॉल या ५१ वर्षीय व्यक्तीची हत्या केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सोनल पार्क बिल्डिंग क्रमांक एकच्या तळमजल्यावर ज्वेलरी बनवण्याचे दुकान असलेले ५१ वर्षाचे दुकानदार सुशांतू पॉल हे मयत अवस्थेत मिळून आले. त्यांच्या डोक्यावर खोलवर जखमा झालेल्या होत्या. मंगळवारी रात्री दोन ते अडीच वाजेपर्यंत ते राहत असलेल्या दुकानात जोरजोरात आवाज येत असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या डोक्यावर कोणत्यातरी मोठ्या जड वस्तूने मारल्याने डोक्यात अनेक जखमा झालेल्या आहेत. या घटनेची पोलिसांना बुधवारी दुपारी माहिती मिळाली. पोलिसांना माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेवून शवविच्छेदनासाठी पंडीत भीमसेन जोशी रुग्णालयात पाठवला आहे. तसेच फॉरेन्सिक व्हॅनद्वारे तपास सुरू केला आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धिरज कोळी यांनी सांगितले आहे. तर सदरील गुन्ह्याचा समांतर तपास काशीमिरा गुन्हे शाखा युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशीलकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखालील पथक सुद्धा करत होते. तपासात कौटुंबिक वादातून पत्नी अमृता पॉल आणि मुलगा सुमित यांनी मिळून हत्या केल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन मुलगा अनित यालाही विधीसंघर्षित बालक म्हणून ताब्यात घेण्यात आले आहे. १८ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी मयत सुशांतू पाल याचे शॉपमध्ये त्यांची पत्नी अमृता ,मुले सुमित, अनित यांच्याशी भांडण झाले होते. त्यामुळे त्यांच्यावर संशय होता. पाल यांची पत्नी अमृता आणि मुले सुमित, अनित यांच्याकडे गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. नमूद महिला आरोपी अमृता पाल आणि मुलगा सुमित पाल यांना अटक करण्यात आली असून विधीसंघर्षीत बालक अनित पाल यास तपासकामी ताब्यात घेवून रिमांडकामी न्यायालयात हजर करण्यात आले. या गुन्हयाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक तृप्ती देशमुख करत आहेत. सदर कारवाई ही पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे पोलीस उपायुक्त संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सोहेल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक धिरज कोळी, महिला पोलीस निरीक्षक तृप्ती देशमुख, पोलीस निरीक्षक दत्तात्रय ढुमे, सहाय्यक पोलीस अमोल तळेकर, पोलीस उपनिरीक्षक संपत आहेर, संदिप व्हसकोटी, पोलीस हवालदार संतोष पाटील, व्हनमारे, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, सुनिल लाड, कांगणे, मुकेश निकम, ओंकार यादव, काटकर, सुरजसिंग घुनावत, पोलीस शिपाई नवनाथ पवार, अक्षय पोवार, उमेश अस्यार यांच्या पथकाने केली.

## अनैतिक संबंधामुळे प्रियकराचा घात ...

असली तरी ती दोन मुलांची आई ही आहे. ती आपल्या नवऱ्याला सोडून बऱ्याच वर्षापासून नागनपल्ली येथे आपल्या माहेरी राहत असते. तिने ही नवऱ्याला सोडले असल्याने माहेरमध्येच ती वेगळे राहत होती. त्यातच ती मोलमजुरी करीत असताना तीची ओळख विष्णुबरोबर झाली. पुजा ही विवाहित आणि दोन मुलांची आई आहे हे माहित असून देखील विष्णु तिच्यासोबत त्या संबंधातून राहत होता. नेमकी हिच गोष्ट पुजाच्या नातेवाईकांना आणि तिच्या माहेरच्या लोकांना खटकत होती. पुजाचे भाऊ अशोक आणि गजानन याचे गावात मोठे प्रस्थ होते त्यांना गावात मान होता. त्याची थोडी फार शेत जमीन असल्याने गावातील लोक ही त्यांना मानमरातब देत होते. त्यातच त्याची बहिण पुजा ही गावातच अनोळखी पर पुरूषासोबत राहत असल्याने गावातील त्याची उरली सुरली इज्जत ही धुळीला मिळाली होती. त्यांनी बऱ्याच वेळेला पुजाला समजावून सांगितले की, तिने विष्णुचा नाद सोडावा परंतु ती त्याच्यावर आणि तो तिच्यावर प्रेम करीत असल्याने दोघे ही त्या संबंधापासून वेगळे व्हायला तयार नव्हते. अशोक आणि गजानन यांनी विष्णुला ही आपल्या बहिणीचा नोद सोड म्हणून सांगितले होते. परंतु पुजाच्या प्रेमात वेडा झालेला विष्णु तिला सोडायला तयार झाला नाही. हे प्रकरण गावातील पंचासमोर ही गेले. त्यावेळी पुजाने आपल्या दोन्ही भावांचा विरोध पत्करून मी आणि माझी दोन्ही मुले विष्णु सोबत राहणार आहे असे ठामपणे सांगितले. तीने त्याच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतल्याने हे प्रकरण आणखीन चिघळले. त्यातच पुजाच्या भावांनी विष्णुला एकटे गाठून तु परत गावात दिसलास तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी ही दिलेली होती. त्यामुळे विष्णु हा नागनपल्ली येथून महाराष्ट्रीला आपल्या गावी म्हणजे गौनगाव येथे आला. त्यावेळी त्याने नागनपल्ली येथे घडलेली सगळी घटना आपली आई लक्ष्मी हिला सांगितली. विष्णुची आई ही नागनपल्ली येथे बऱ्याच वर्षापुर्वी राहयला असल्याने त्या गावातील रिती रिवाज आणि लोक कसे आहेत हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांनी मुलगा विष्णु याला परत तु नागनपल्ली येथे जावु नकोस ते लोक तुझ्या जीवाचे काही तरी बरे वाईट करतील असे सांगून गप्प बसविले. परंतु पुजाला तो विसरू शकत नसल्याने त्याला तिच्या शिवाय काही करमत नव्हते. म्हणून तो सारखा अधून मधून प्रियेसी पुजाला फोन करून तिलाच आपल्या गावी बोलावित होता.परंतु तिला मराठी येत नसल्याने ती आपले गाव सोडयला तयार नव्हती.तिने उलट त्यालाच सांगितले की,तुच नागनपल्ली येथे ये आपण दोघे एकत्र राहु संसार करू मी आहे, तुझ्या बरोबर तुला कोण काय करते ते मी बघतेच.तिने त्याला विश्वासात घेऊन परत येण्यास सांगितल्याने तो ही परत नागनपल्ली येथे जायला तयार झाला. ऑक्टोंबर २०२५ मध्ये तो परत नागनपल्ली येथे राहयला आला. येथे येवून तो प्रियेसी पुजा सोबत राहू लागल्याने ही गोष्ट परत पुजाच्या भावांना समजली. पुजाच्या भावांनी दोघांना ही परत परत समजावून सांगितले, परंतु दोघे ही एकमेकापासून वेगळे व्हायला तयार होत नव्हते. आपल्या गावात येवून आपल्या बहिणीबरोबर विष्णु मजा मारत आहे आणि ते ही आपल्या डोळ्यासमोर हे अशोक आणि गजानन यांना पटत नव्हते. दारूच्या नशेत ते दोघे भाऊ पुजाच्या घरी येवून त्याला घरातून बाहेर काढ नाही तरी आम्ही त्याला आम्ही जिवंत सोडत नाही अशी धमकी देत होते. त्यावेळी ही तिने आपल्या भावांना सांगितले की, मी नवऱ्याला सोडून दिले आहे मी आता विष्णु सोबतच राहणार आहे. तिचा हा ठाम निर्धार ऐकून तिच्यावर दोघे ही भाऊ चिडले. तिच्यावर पिसाळले. आमच्या गावात तु दुसऱ्या पुरूषाला घेऊन राहणार त्याच्यासोबत आमच्या समोर मजा मारणार तुला आणि त्याला सोडत नाही आता आम्ही काय करतो ते बघ अशी तंबी त्यांनी तिला दिली. त्याच्या धमकीच्या इशाऱ्याला ती काही घाबरली नाही. उलट तिने आपल्या दोन्ही भावांना चॅलेज केले की, मी विष्णु सोबत इथेच राहून संसार करून दाखविते.त्यामुळे दोघा ही भावांनी आता वेगळाचा विचार केला. आपल्या बहिणीला नादाला लावणाऱ्या विष्णुला आता सोडयचे नाही त्याला कायमची जन्माची अद्दल घडवायची असा निर्णय त्या दोघांनी घेतला. शनिवार दि.२५ ऑक्टोंबर २०२५ रोजी नागनपल्ली येथील हुनमान मंदिरात पुजा आणि विष्णु देवदर्शनासाठी गेले. हनुमान मंदिर हे गावातील चौकात असले तरी तेथे फारशी वर्दळ नसते. जो जो आपआपल्या कामाला जात येत होता. त्यामुळे सकाळ सकाळी मंदिरात आणि रस्त्यावर ही गर्दी नव्हती. हुनामान मंदिरातील देवदर्शन करून पुजा ही बाहेर आली. काही तरी काम निघाले म्हणून विष्णु मंदिरात थांबला. त्याला तेथे एकटे थांबले असल्याचे बघून पुजाचे दोघे भाऊ अशोक आणि गजानन हे दोघे आपल्या हातात काठया घेऊन तेथे आले. त्यांनी विष्णुला हनुमान मंदिरातून बाहेर ओढून काढले. त्याला काठीने मारहाण करीत रस्त्यावर आणले. तेथे रस्त्यावरील एका खांबाला त्यांनी विष्णुला दोरीने बांधले. दोरीने बांधलेल्या विष्णुला त्यांनी पकडून लाठ्या काठीने मारहाण करायला सुरूवात केली. ते दोघे एवढयावरच थांबले नाहीत तर त्यांनी मंदिराच्या बाहेर जमा झालेल्या लोकांना ही इथून जावा आम्ही विष्णुला सोडणार नाही त्याला आज जन्माची अद्दल घडविणार आमच्या मध्ये पडू नका असे सांगितले. त्याला कन्नडमध्ये शिव्या देत त्याच्या डोक्यावर, मानेवर पायावर आणि हातावर काठीने बडता बडवित त्याची साल सोडून काढली. त्याच्या डोकीवर आणि तोंडावर काठीने जबर मारहाण केल्याने त्याच्या अंगातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला.तो जिवाच्या आकांताने ओरडत होता, परंतु त्याला मदत करायला कुणी ही पुढे आले नाहीत. उलट रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांनी त्याच्या मारहाणीचा व्हिडीओ आपल्या मोबाईलवर चित्रीत करून ते सोशल मिडियावर व्हायरल केला. त्याला खांबाला बांधून मारहाण करून ते दोघे ही रागाने काठया तेथेच टाकून निघून गेले. त्यानंतर गावातील काही लोकांनी विष्णुला खांबाला बांधलेले सोडले. त्याची गंभीर अवस्था बघून गावातील जाणकार लोकांनी त्याला उपचारासाठी चिंतकी येथील सरकारी दवाखान्यात नेले.एखाद्या मारधाड कन्नड चित्रपटातील दृश्याप्रमाणे तेथे घटना घडत होती. परंतु विष्णुच्या मदतीला कुणी आले नाही. चिंतकी येथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याची गंभीर अवस्था बघून त्याला पुढील उपचारासाठी बिदर येथील ब्रिक्स हॉस्पिटल मध्ये नेण्याचा सल्ला नातेवाईकांना दिला. तेथील उपचारानंतर विष्णुला बिदर येथील ब्रिक्स हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना विष्णुचा मृत्यु झाला. या घटनेची माहिती विष्णु याची आई लक्ष्मी यांना चिंतकी पोलीसांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच त्या ही तातडीने नागनपल्ली येथे आल्या. त्यांनी या घटनेची फिर्याद चिंतकी पोलीस स्टेशनला देवून आपल्या मुलाच्या मृत्युला पुजाचे दोन्ही भाऊ जबाबदार असल्याचे सांगुन मयत विष्णु याचे अशोक आणि गजानन यांची विवाहित बहिण पुजा सोबत विवाहबाहय संबंध होते त्यातुन विष्णु हा पुजा सोबत राहयला असल्याने दोघा भावांनी मिळून त्याची हत्या केल्याचा आरोप करीत फिर्याद दाखल केली. लक्ष्मी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चिंतकी पोलीस ठाण्यात विष्णु याच्या हत्येप्रकरणी अशोक आणि गजानन याच्या विरोधात आयपीसी कलम १०९,११८(१) ३५२, आणि १२७ (२) आणि खूनाचा गुन्हा कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या दोघांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अशोक आणि गजानन यांना बिदर येथील कोर्टात हजर केले असता मा.न्यायालयाने या दोघांची रवानगी बिदर येथील जिल्हा कारागृहात केली. या दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली काठया जप्त केले. या घटनेचा पुढील तपास चिंतकी पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंधात ज्यावेळी महिला आणि पुरूष एकत्र राहत असतात त्यावेळी नातेवाईकांना त्याचे एकत्र राहणे पसंत पडत नसते. त्यातच आज ही समाजात उच्च निच्च असा वर्ग असल्याने विवाहबाहय संबंध हे नातेवाईकांच्या पचनी पडत नाही.त्यातून सामाजीक मानसिकतेतून अशा खूनाच्या घटना घडतात. त्यातच कर्नाटकात आणि इतर ठिकाणी अशा क्रुर घटना घडतात आणि याच घटना चित्रपटात अतिरंजितपणे दाखविल्या जातात हेच या घटनेवरून दिसून येते.

## म्हातारा नवरा पण संशयी फार...

वय ५६ वर्ष असून पत्नी मुमताज सोबत मालवणी परिसरात राहत होता. मागील दोन महिन्यापासून पत्नी मुमताजच्या चरित्र्यावर त्याला संशय होता, याच्याच राग धरून काल (गुरूवारी, ता २०) सकाळी आरोपी पतीने दगडाने ठेचून पत्नीची हत्या केली. सध्या मालवणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी पती सिराज नाईक याला अटक केली आहे. हत्या मागे अजून काही कारण आहे का या संदर्भात अटक आरोपीकडून मालवणी पोलीस अधिक तपास करत आहे. तर मिळालेल्या माहितीनुसार मालाडच्या मालवणी परिसरात राहणार्या एका ५२ वर्षांच्या महिलेची तिच्याच पतीने दगडीने ठेचून निर्घृणपणे हत्या केली. मुमताज सिराज नाईक असे मृत महिलेचे नाव असून तिच्या हत्येप्रकरणी आरोपी पती सिराज अहमद आदम नाईक (५७) याला मालवणी पोलिसांनी अटक केली. हत्येच्या याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. सकाळी उघडकीस आलेल्या या हत्येच्या घटनेने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड खळबळ उडाली होती. ही घटना बुधवारी रात्री उशिरा अडीचच्या सुमारास मालाडच्या मालवणी परिसरात घडली. याच परिसरात नाईक कुटुंबिय राहतात. सिराज हा त्याची पत्नी मुमताजच्या चारित्र्यावरुन संशय घेत होते. तिचे इतर पुरुषांसोबत संबंध असल्याचा आरोप करुन तिला शिवीगाळ करुन मारहाण करत होता. या कारणावरुन त्यांच्यात नेहमीच वाद होत होते. दगडाने ठेचून हत्या केली होती. हत्येनंतर सकाळी तो मालवणी पोलीस ठाण्यात आला आणि त्याने तिथे उपस्थित पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. त्याने त्याच्या पत्नीची हत्या केल्याचे सांगताच पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले होते. यावेळी मुमताजला पोलिसांनी शताब्दी रुग्णालयात दाखल केले. तिथे तिला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी मालवणी पोलिसांनी सिराज नाईक याच्याविरुध्द हत्येचा गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यांत त्याला नंतर पोलिसांनी अटक केली. पोलिस घटनेचा सखोल तपास करत आहेत. पत्नी मुमताज नाईक (वय ४५) हिची हत्या ती झोपेत असताना केली. ही घटना एसआरए प्रकल्पांतर्गत मिळणाऱ्या फ्लॅटसाठी झालेल्या वादातून घडल्याचे समोर आले आहे. नाईक आपल्या पत्नी आणि तीन मुलांसोबत मालवणी परिसरात राहत होता. त्याचे घर एसआरए प्रकल्पाचा भाग होते. फ्लॅट मिळवण्यासाठी बिल्डरला ९.७० लाख रुपये द्यावे लागतील, असे त्याने पत्नीला सांगितले होते. मात्र मुमताजने यास विरोध केला आणि दोघांमध्ये जोरदार वाद झाला. वादानंतर मुमताज झोपायला गेली. त्यानंतर आरोपीने एक जड दगड आणून तिच्या डोक्यात वार केला. यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर सिराज नाईक थेट मालवणी पोलीस स्टेशनमध्ये आला आणि गुन्ह्याची कबुली देत आत्मसमर्पण केले. पोलिसांनी त्याला खुनाच्या गुन्ह्यात अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## जमिनीचा वाद अखेर प्राणावर बेतला...

घराच्या वाटणी वरून दोघा भावात नेहमी भांडण तंटा होत होता. त्यातच शेतीची ही मनासारखी वाटणी झालेली नव्हती.एकंदरच घराच्या स्थावर प्रॉप्रटीवरून दोघा भावात रोज भांडण तंटा होत होता. बऱ्याच वेळेला त्याची भांडणे शेजाऱ्यांनी आणि पै-पाहुण्यांनी मिटवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्याची भांडणे आणि वाद काही केल्या मिटत नव्हता. या कारणातून दोघा भावाच्यात हाणामारी ही झालेली होती. त्याच्या भांडणात त्याचे आई-वडिल हे कधी कधी दोघांचे म्हणणे ऐकून न घेता ते मोठा मुलगा यालाच दोष होते. त्यातच शेतीची ही वाटणी राकेश याच्या मनाप्रमाणे झालेली नसल्याने त्याला ती वाटणी देखील मान्य नव्हती.म्हणून तो भाऊ संजु याच्या बरोबर शेतीची आणि घराची बरोबर वाटणी कर म्हणून त्याच्या मागे लागलेला होता.त्याला या दोन्ही गोष्टी शिवाय चैन पडत नव्हती. घरात त्याची रोजची भांडणे ठरलेली होती. ती भांडणे काही केल्या मिटत नव्हती. त्यातच संजू याने आपल्या आई-वडिलांना या कारणातून घराबाहेर काढले होते. आपले आई वडिल हे आपल्या घराच्या वाटणीबाबत आपला विचार घेत नाहीत उलट धाकटया भावाचे म्हणणे ऐकून घेऊन ते त्याच्याच बाजूने बोलतात याचा राग संजु पाटील याला होता. त्यामुळे तो आणि त्याची बायको आई वडिल आणि राकेश आणि त्याच्या बायकोला घाण घाण शिव्या देत नको नको ते बोलत होते. त्यामुळे त्याची भांडणे मिटण्याऐवजी वाढतच चालेली होती. राकेश हा आपल्या आई वडिलांना शिकवत आहे असा समज संजु आणि त्याच्या बायकोने करून घेतला होता. दोघे ही एकमेकांना समजून घ्यायला तयार नव्हते. रोजची भांडणे आणि खुन्न्स वाढतच होती. काही केल्या घराची वाटणी करायला मोठा भाऊ संजू तयार नाही हे राकेश याला समजून चुकले होते. त्यामुळे तो त्याच्यावर डाव धरून होता कधी एकदा याला जन्माची अद्दल घडतो असे त्याला वाटत होते. यातून काही ही मार्ग निघत नाही हे त्याने ओळखले होते. म्हणून तो संजू याची गेम करण्याच्या विचारात होता. परंतु एकटाने गेम करायला शक्य होणार नाही हे त्याने ओळखले असल्याने त्याने याची कल्पना आपला नातेवाईक कैचाप्पा पाटील याला दिलेली होती.कैचाप्पा हा त्याचा चुलत भाऊच होता त्याला सगळया गोष्टी माहित होत्या. त्याचे आणि राकेशचे जमत होते. दोघे ही दारू प्यायला एकत्र बसत असल्याने एकदा दारू पित असताना दोघांनी ही संजु याची कशी गेम करायची याचा विचार केला. आपल्या ऊसाच्या शेतात रोज सायंकाळी संजु हा जात येत असतो याची कल्पना दोघांना ही होती. त्याप्रमाणे त्यांनी त्याला मारण्याचा डाव रचला.तो ऊसाच्या शेतात आला की त्याच्यावर विळ्याने वार करायचे आणि त्याला संपावयचे असा त्यांनी प्लॅन रचला.मोठा भाऊ संजू हा मुद्दामच आपल्याला शेतीची आणि घराची वाटणी करून देत नाही सगळा हिस्सा त्यालाच पाहिजे आहे म्हणून तो वारंवार वाटणी करण्याचे टाळत आहे असा समज राकेश याने करून घेतलेला होता. त्याने ही गोष्ट बऱ्याच वेळेला नातेवाईकांना सांगितलेली होती. नातेवाईकांनी ही त्याच्या भांडणात मध्यस्थी करीत त्याचा वाद मिटविण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु वाद काही मिटत नव्हता. संजु याने केलेली वाटणी राकेश याला पसंत पडत नव्हती. तो वाटणी चुकीची करीत आहे असे त्याचे म्हणणे होते. वाटणी मनासारखी होत नाही म्हणून त्याने भावाचाच काटा काढायाचा असा विचार केला. नेहमी प्रमाणे संजु पाटील हा ४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजणेच्या सुमारास ऊसाच्या शेतात गेला. त्यावेळी शेतात राकेश पाटील आणि त्याचा नातेवाईक कैंचाप्पा पाटील हे तेथे दबा धरून बसलेले होते.उसाच्या एका सरीत आडोशाला ते विळा घेऊन बसलेले होते. ऊसाची पाहणी करीत संजु पाटील हा ऊसाच्या मध्ये आला असता राकेश याने पाठीमागून येत आपल्याकडील विळ्याने त्याच्या छातीवर उजव्या बाजुला सपासप असे वार केले. त्यासरशी संजू पाटील हा ओरडत रक्ताच्या थारोळ्यात पडला. तो खाली पडल्यावर कैचाप्पा पाटील याने त्याने बाजुला ओढत नेले. तेथे परत संजु याने त्याच्यावर विळ्याने वार केले. त्या सरशी संजू पाटील हा गंभीर जखमी झाला. त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला होता. आता याच्या मृत्यूचे बनाव करायाचे म्हणून राकेश पाटील आणि कैंचाप्पा पाटील यांनी आराडा ओरडा करून संजु याच्या हाताला विळा लागून गंभीर जखमी झाल्याचा बनाव करीत लोकांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्याचा आरडा ओरडा ऐकून आजुबाजुचे लोक ही धावत घटनास्थळी जमा झाले. त्यांनी गंभीर जखमी झालेल्या संजु पाटील याला उचलून एका खाजगी वाहनातून हुक्केरी येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले. तेथील त्याची गंभीर अवस्था पाहून त्याला बेळगावी येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेण्याचा सल्ला तेथील डॉक्टरांनी दिला. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना बुधवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृत्यु झाल्याचे बघून मयत संजु पाटील याच्या पत्नी आणि मुलांनी दवाखान्यात मोठयाने आक्रोश केला. या घटनेची शंका डॉक्टरांना आल्याने त्यांनी या घटनेची माहिती यमकनमर्डी पोलिसांना दिली. यमकनमर्डी पोलीस स्टेशनचे पो.निरी.जावेद मुशापुरी यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी या घटनेची पाहणी करून पंचनामा केला. घटनास्थळी अतिरिक्त पोलीस प्रमुख आर.बी. बसर्गी यांनी भेट देवून या घटनेची चौकशी करण्याचे आदेश यमकनमर्डी पोलीसांना दिले. पोलीस या घटनेची चौकशी करत असताना राकेश पाटील याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती. तो वारंवार पोलीसांना सांगत होता की, त्याचा मोठा भाऊ संजु पाटील हा ऊस तोडत असताना त्याला विळा लागल्याने त्यात तो गंभीर जखमी झाला आणि उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला. परंतु पोलिसांना वेगळीच शंका येत होती. मयत संजु हा उजवा खुरा असल्याने तो आपल्या उजव्या हातांनी सगळी कामे करीत होता मग त्याच्या छातीवर डाव्या बाजुला विळ्याचा ऊस तोडत असताना कसा घाव बसेल अशी शंका पोलीसांना येत होती. पो.निरी जावेद मुशापुरी यांना याची शंका आल्याने त्यांनी ताब्यात असलेल्या राकेश पाटील याच्यावर आपल्या प्रश्नाची सरबती केली. त्यात तो गडबडला. त्याला त्याच्या प्रश्नाची उत्तरे देता येईनात पोलीसांच्या प्रश्नापुढे तो फिका पडला. त्यानंतर त्याने आपला गुन्हा कबुल केला मयत संजू पाटील हा आपला मोठा भाऊ असून त्याच्यासोबत आपली घराची आणि शेताच्या वाटणीवरून सतत भांडणे होत होती. त्यातच ही भांडणे काही मिटत नसल्याने मी माझा नातेवाईक कैचाप्पा पाटील असे दोघे मिळून ४ नोव्हेंबर २०२५ च्या दुपारी शेतात संजु पाटील आला असता त्याच्यावर विळ्याने वार केला. त्यात तो गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यु झाला.त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेतील दुसरा संशयीत आरोपी कैचाप्पा पाटील याला ही यमकनमर्डी पोलीसांना ताब्यात घेतले.त्याने ही पोलीससमोर आपला गुन्हा कबुल केला. दोघांनी ही आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची फिर्याद मयत संजु पाटील याच्या पत्नीकडून पोलीसांनी घेतली. तिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी संजु महादेव पाटील (वय ३१) याच्या खून प्रकरणी त्याचा धाकटा भाऊ राकेश महादेव पाटील (वय २८) आणि त्याचा नातेवाईक कैंचाप्पा हलुप्पा पाटील (वय ३०) रा.तिघे ही कुरणी तालुका हुक्केरी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या दोघांना ही बुधवार दि.५ नोंव्हेंबर रोजी हुक्केरी येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवनागी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलिसांनी राकेश पाटील याच्याकडून गुन्हयात वापरलेला विळा जप्त केला. या घटनेचा पुढील तपास यमकनमर्डी पोलीस स्टेशनचे पो.निरी. जावेद मुशापुरी याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## पाण्यावरून झालेला वाद भयंकर...

पुन्हा पाणी भरण्यावरून वाद सुरु झाला. बघता बघता शुल्लक कारणावरून सुरु झालेला हा वाद अगदी विकोपाला जाऊन पोहोचला. यावेळी संतापलेल्या कुंदा तुपेकर यांनी घरातून डास मारण्याचा स्प्रे आणला आणि तो स्प्रे थेट उमेश पवार यांच्या तोंडावर मारला. स्प्रेच्या तीव्र वासामुळे उमेश पवार हे बेशुद्ध होऊन जागीच कोसळले. तर अचानक बेशुद्ध पडल्यामुळे उमेश पवार यांना कुटुंबीयांनी तातडीने उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, दुर्दैवाने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच अर्नाळा सागरी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतकाच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. आम्ही याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून आरोपी महिला कुंदा तुपेकर (४६) हिला अटक केली आहे. तसेच याबाबतचा पुढील तपास सुरू आहे., अशी माहिती अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी दिली. पाणी भरण्यासारख्या एका अतिशय क्षुल्लक कारणावरून एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागल्याने जेपी नगर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. वसई विरार शहरातील वाढती लोकसंख्या आणि अपुरा पाणीपुरवठा यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी मोठे हाल होत आहेत. अनेक ठिकाणी नळाला कमी दाबाने पाणी येत असल्यामुळे किंवा फार कमी वेळेसाठी पाणी येत असल्यामुळे सार्वजनिक नळावर किंवा सोसायटीच्या टँकरवर पाणी भरण्यासाठी नागरिकांमध्ये अक्षरशः झटापट सुरू असते. सार्वजनिक नळावर पाणी भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमते. रांगेतील जागा, पाणी भरण्याच्या वेळेचा भंग किंवा जास्त भांडी भरण्यावरून दररोज नळावर वादावादी होते. हे वाद कधीकधी इतके विकोपाला जातात की, शेजारी एकमेकांच्या अंगावर धावून जातात. ज्यामुळे शुल्लक वादातून गंभीर घटना घडतात.

क्राईम संध्या | सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. ३० नोव्हेंबर २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# विरारमध्ये अडीच वर्षांच्या मुलाचा संशयास्पद मृत्यू

## औषध घेतल्यानंतर प्रकृती बिघडल्याचा कुटुंबियांचा आरोप

**विरार : वार्ताहर**






विरार पूर्वेकडील सहकार नगर येथील साई अपार्टमेंटमध्ये राहणारे संतोषकुमार कामत यांचा अडीच वर्षांचा मुलगा प्रयाग कामत याचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात शोक आणि संताप व्यक्त केला जात आहे. कुटुंबाने स्थानिक औषध विक्रेत्याच्या निष्काळजीपणाला जबाबदार धरले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील वोल्केश्वर येथील चालक संतोषकुमार कामत (३३) हे त्यांच्या पत्नी आणि तीन मुलांसह विरारमध्ये राहतात. बुधवारी दुपारी त्यांचा धाकटा मुलगा प्रयाग याने पोटदुखी आणि उलट्या होत असल्याची तक्रार केली. कुटुंबीयांनी त्याला जवळच्या नेत्ररोग क्लिनिकमध्ये नेले, जिथे डॉ. कांते यांनी दोन सिरप दिले. संध्याकाळपर्यंत मुलाची प्रकृती थोडी सुधारली. तथापि, गुरुवारी सकाळी उलट्या अचानक वाढल्याने प्रयागची प्रकृती आणखी बिघडली आणि तो बेशुद्ध पडला. कुटुंबाने त्याला ताबडतोब विरार पश्चिमेतील संजीवनी रुग्णालयात नेले, परंतु डॉक्टरांनी त्याला दाखल करण्यास नकार दिला, कारण रुग्णालय मुलांवर उपचार करण्यासाठी योग्य नाही आणि त्यांना जोशी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. कुटुंबाने घाईघाईने जोशी रुग्णालयात धाव घेतली, जिथे डॉक्टरांनी मुलाला मृत घोषित केले. या धक्क्याने कुटुंबियांना धक्का बसला आणि त्यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अपघाती मृत्यू अहवाल (एडीआर) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. विरार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक एल.एम. तुरे यांनी सांगितले की, भारतीय दंड संहिता (BNS) च्या कलम १९४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि पुढील तपास सुरू आहे. तुरे म्हणाले की, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मुलाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, ज्याच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल. या घटनेमुळे परिसरातील क्लिनिकच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे आणि कुटुंब न्यायाची मागणी करत आहे.

# लोकलमध्ये मराठी बोलला नाही म्हणून टोळक्याची विद्यार्थ्याला जबर मारहाण!

## तणावातून मुलाने आत्महत्या केल्याचा वडिलांचा आरोप

**कल्याण : वार्ताहर**



कल्याण येथे मराठी-अमराठी वादाने एका मुलाचा जीव घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. कल्याण पूर्व येथील तिसगाव नाका परिसरातील हा धक्कादायक प्रकार असल्याची माहिती आहे. अर्णव खैरे महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. मुलुंड येथे कॉलेजला जाताना ट्रेनमध्ये धक्का लागला त्यावरून हिंदी मराठी बोलण्यावरून वाद झाला. या वादातून चार ते पाच जणांनी अर्णव खैरे याला बेदम मारहाण केली होती. या मारहाणीनंतर मानसिक तणावात असलेल्या अर्णव खैरे याने राहत्या घरी गळफास घेऊन आपले आयुष्य संपवले होते, असा आरोप मयत अर्णव खरे याचे वडील जितेंद्र खैरे यांनी केला आहे. या प्रकरणी कोळसेवाडी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून तपास सुरु करण्यात आला आहे, अशी माहिती आहे. याप्रकरणी अर्णवचे वडील यांनी काही गंभीर आरोप केले आहेत. माझा मुलगा अर्णव नेहमीप्रमाणे कॉलेजला जायला निघाला. त्याचा फर्स्ट क्लासचा पास संपला असल्याने त्याने सेकंड क्लासचं तिकीट घेतलं. त्याने कल्याणवरुन लोकल पकडली. त्याच्यासमोर एक हिंदी भाषिक मुलगा होता. गर्दी असल्याने त्या व्यक्तींचं प्रेशन अर्नववर येत होतं. त्यामुळे तो समोरच्या व्यक्तीला हिंदीत म्हणाला की, माझ्यावर खूप प्रेशर येत आहे, तुम्ही थोडं समोर व्हा. तेव्हा आसपासच्या प्रवाशांनी अर्णवच्या कानशीलात गलावली आणि बोलले की मराठीत बोल. तर अर्णव म्हणाला की मी मराठीच आहे, मग ते म्हणाले की मराठी असून मराठी बोलायला लाज वाटते का? असं म्हणत त्याला मारहाण केली. मी त्याला विचारलं की तू भांडण वाढवलंस का, तर अर्णव नाही म्हणाला, माझी माझ्या मुलांना तशी शिकवणही नाही. अर्णवने मला मेसेज करुन सांगितलं की मला मळमळ होतेय, मी कॉलेजमधून घरी चाललो. मी बोललो ठीक आहे. त्याने नेहमीप्रमाणे मला फोनवरुन सांगितलं की मी कल्याण स्टेशनला उतरलो आहे. तो मग घरी आला, मला सांगितलं. त्यानंतर दहा ते पंधरा मिनिटांनी मला पुन्हा कॉल केला, मग त्याने मला घडलेली गोष्ट सांगितली, मी बोललो तू घाबरु नकोस आपण त्यांना हवं तर रेल्वे पोलिसांना सोबत घेऊन जाऊ आणि विचारु उद्या. माझ्या मुलाला ज्यांन त्रास दिला आणि त्याला जीव देण्यास भाग पाडले त्यांना शोधून काढावं आणि कठोर शिक्षा करावी. माझा मुलगा गेला, दुसऱ्यांसोबत असं काही होऊ नये, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# खोटा गुन्हा नोंद करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांसह महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची व्यावसायिक श्रीकर फड यांची मागणी

**लातूर : वार्ताहर**



लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यास भाग पाडणाऱ्या महावितरणच्या मुख्य अभियंत्यासह पोलीस निरीक्षक समाधान चावरे, पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी व्यावसायिक श्रीकर त्र्यंबकराव फड यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली. आपल्या स्वतःच्या कमर्शियल जागेतील कालबाह्य झालेली कमकुवत विद्युत लाईन स्थलांतरित करण्याकरिता आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया पार पाडून, नियमाप्रमाणे पूर्ण रक्कम भरणा करूनही महावितरणचे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत. तसेच या संदर्भातील दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी आपण न्यायालयात याचिका दाखल करून केली होती. आपल्या याचिकेप्रमाणे अंबाजोगाई न्यायालयाने दोषी अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाही कर्तव्यात कसूर करणाऱ्या महावितरणच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न महावितरणचेच अधिकारी, कर्मचारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे, असे सांगून श्रीकर पुढे म्हणाले की, लातूर एमआयडीसी परिसरातील महावितरणच्या कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी आपल्याला त्यांच्या कार्यालयात ते स्वतः हजर नसताना जावक क्रमांक नसलेला अहवाल घेऊन जाण्यास बोलावले होते. आपण त्यांची भेट घेऊन चर्चा करण्याच्या उद्देशाने कार्यालयातील त्यांच्या केबिनमध्ये बसलो असताना तेथून जबरदस्तीने पोलीस बळाचा वापर करून आपल्याला एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चावरे व पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांनी आपल्याला एखाद्या सराईत गुन्हेगारांसारखी वागणूक दिली. आपल्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून कोठडीत बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा आरोपही श्रीकर फड यांनी यावेळी केला. तसेच या पत्रकार परिषदेत श्रीकर यांनी त्यांच्यावर समाधान चावरे यांच्याकडून करण्यात आलेल्या मारहाणीचा, शिवीगाळीचा व्हिडिओही पत्रकारांना दाखविला.

पोलीस अधिकारी चावरेयांच्या सारख्या फिर्यादीलाच आरोपी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोल्स अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण लातूर पोलीस दलाची प्रतिमाच मलीन होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी आपण मानवाधिकार आयोग, नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक, लातूरचे पोलीस अधीक्षक, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडेही रितसर तक्रार करून पोलीस निरीक्षक समाधान चावरे व महावितरणच्या संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केल्याचे सांगितले. पोलीस दलात सामान्यांना मदत, सहकार्य करणारे अनेक पोलीस अधिकारी आहेत. मात्र चावरे यांच्यासारख्या बोटांवर मोजण्याइतक्या प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांमुळे पोलीस दलाची प्रतिमा डागाळली जात असेल तर त्यावर वरिष्ठानी वेळीच उचित कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे श्रीकर यांनी स्पष्ट केले. यावेळी ॲड. अनंत केंद्रे यांचीही उपस्थिती होती.

# जागतिक शौचालय दिन निमित्त 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' ही विशेष मोहिम - मनोज रानडे

**पालघर : वार्ताहर**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त पालघर जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) विभागामार्फत हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहिम १९ नोव्हेंबर पासून सुरू करण्यात आला आहे. ही मोहीम मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे.

शौचालये ही केवळ सोयीची नव्हे तर आरोग्य, प्रतिष्ठा व सुरक्षिततेची हमी देणारी मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली सार्वजनिक शौचालये यांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत शाळा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक सेवाभावी संस्था यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिस्सारण तसेच पर्यावरण संवर्धन अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत गावागावांत मोहिमेचे विविध उपक्रम राबविण्यात येतील. उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये यांना अंतिम टप्प्यात विशेष गौरव करण्यात येणार आहे. १० डिसेंबर रोजी मोहिमेचा समारोप करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील. तरी या स्वच्छता मोहिमेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती मधील ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारसकर यांनी केले आहे.

# मालेगावातील बालिकेवरील अत्याचार करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा द्या!

## मानवी हक्क अभियानाचे देवणी तहसीलदारांना निवेदन



**देवणी : प्रतिनिधी**

मालेगाव तालुक्यातील डोंगराळ येथील तीन वर्षीय बालिकेवर झालेल्या निर्घुण आत्याचाराणे संपूर्ण महाराष्ट्रात संताप उसळला आहे. मानवी हक्क अभियानाच्या वतीने निषेध नोंदवून देवणी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला तात्काळ कठोरात कठोर फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर मानवी हक्क अभियानचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, गजानन गायकवाड, डी एन कांबळे, रेखा लांडगे, मोतिरावे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मिरा-भाईंदर पालिकेच्या कचरा निविदेत ८०० कोटींचा भ्रष्टाचार? काँग्रेसचा सत्ताधाऱ्यांवर आरोप

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

मिरा-भाईंदर पालिकेच्या कचरा संकलन वविल्हेवाट प्रकल्पाच्या निविदेत अवाजवी दर दाखवून जवळपास ८०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच या निविदा प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही त्यांनी शासनाकडे केली आहे. मिरा-भाईंदर शहरातून दररोज सुमारे ५०० टन कचरा निर्माण होतो. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उत्तन येथे घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे. २०२३ मध्ये ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट आणि कोणार्क या दोन खासगी कंपन्यांना कचऱ्याचे संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट लावण्यासाठी ५ वर्षांचा एकूण ८०० कोटी रुपयांचा करार मंजूर केला. या करारासाठी प्रति मॅट्रिक टन १० हजार रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र हा दर प्रत्यक्ष बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत जास्त असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. महापालिकेने निवडलेल्या याच कंत्राटदार कंपन्या राज्यातील इतर महापालिकांत ५ हजार ४०० रुपये प्रतिमॅट्रिक टन या दराने काम करतात. परंतु मिरा-भाईंदरसाठीच १० हजार रुपये म्हणजे जवळपास ४,६०० रुपये अतिरिक्त वसूल करण्यात येत असून स्पष्टपणे भ्रष्टाचाराचे लक्षण असल्याचा आरोप काँग्रेस नेते मुज्जफर हुसैन यांनी केला.

# रस्त्याचे काम पूर्ण; पण धोकादायक पूल अजूनही तसाच!

**जव्हार : वार्ताहर**



जव्हार तालुक्यातील मनमोहाडी या अतिदुर्गम भागात करोडो रुपये खर्च करून रस्त्याचे काम पूर्ण झाले असले, तरी जव्हार नदीवरील अत्यंत जुनाट व जीर्ण झालेल्या पुलाचे काम मात्र अद्यापही रखडले आहे. तब्बल ३० ते ३५ वर्षांपूर्वी बांधलेला हा पूल दिवसेंदिवस जीर्ण व नादुरुस्त होत असून, सध्या तो वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. त्यामुळे रस्ता तर झाला पण पूल तसाच राहिला आहे. येथील स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा हा पूल दुरुस्त अगर नवा व्हावा याकरिता पाठपुरावा करूनही पुल दुरुस्ती वा नव्या पुलाबाबत कोणतीही ठोस भूमिका होत नसल्याने मनमोहाडीसह परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा नसल्याने दैनंदिन व्यवहार, शिक्षण, आरोग्य आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागते. राज्यक्रमांक ७७ मार्गावरील जव्हार नदीचा हा पूल पूर्णपणे नादुरुस्त झाला असून स्ट्रक्चर कमकुवत होत असल्याने भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. त्यामुळे तत्काळ स्ट्रक्चर ऑडिट करून पुल पाडून नवीन पूल मंजूर करावा अशी मागणी झाप ग्रामपंचायत चे सरपंच एकनाथ दरोडा, ऐना सरपंच चिंतुराम दखणे, माजी सरपंच तुकाराम गरेल, माजी पोलीस पाटील पांडु खुताडे, वसंत घुलुम यांसह स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाने या समस्या लक्षात घेत केली आहे.परंतु जर वेळेत निर्णय न घेऊन या पुलाचे काम न केल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांपूर्वी बांधलेल्या या पुलामुळे अनेक गावे जोडली गेली आहेत. या परिसरात रस्ता देखील चांगला झाला. मात्र, पुलाची अवस्था दयनीय असल्या कारणाने पूल त्वरित दुरुस्त करण्यात यावा, जेणे करून १५ गावांना जोडणारा मार्ग बंद होणार नाही, असे झाप ग्रामपंचायतचे सरपंच एकनाथ दरोडा यांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक ७९ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २६/११/२०२५ ते ०३/१२/२०२५ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (https://pwd.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०८ (आठ) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.pwd.maharashtra.gov.in 2) http://paytopwd.emahapwd.com

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (रुपये) जी.एस.टी.वगळून | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (अक्षरी) जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. गावदेवी माता सभागृहाच्या वरील भागात कायमस्वरूपी शेडी बांधणे. मु.पो. चिंचणी ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८४०९९५/- | अक्षरी रु. आठ लक्ष चाळीस हजार नवशे पंच्याण्णव मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| २. | देवलाडी अंतर्गत सिंमेंट काँक्रिट रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | रु. ८२४३७५/- | अक्षरी रु. आठ लक्ष चोवीस हजार तीनशे पंचाहत्तर मात्र | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ३. | सातपाटी माळी आगार अंतर्गत चारुनिवास येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे. ता. जि. पालघर | रु. ८२५९०१/- | अक्षरी रु. आठ लक्ष पंचवीस हजार नवशे एक मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ४. | खारेकुरण प्रफुल राजेंद्र गावड यांच्या घरापासून वैजंती विलास नाईक यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता.जि.पालघर | रु. ८२५९००/- | अक्षरी रु. आठ लक्ष पंचवीस हजार नवशे मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ५. | सातपाटी फड येथे वाघोबा मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | रु. ८२५९००/- | अक्षरी रु. आठ लक्ष पंचवीस हजार नवशे मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ६. | मौजे महागाव पानशेत पाडा ते स्मशानभूमीपर्यंत रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | रु. ८२४५९९/- | अक्षरी रु. आठ लक्ष चोवीस हजार पाचशे नव्व्याण्णव मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ७. | मौजे बोईसर महागाव मुख्य रस्ता (MDR-30) ते शांताराम भावर यांच्या जाणारा काँक्रिटीकरण करणे. ता. जि. पालघर | रु. ८२५१२१/- | अक्षरी रु. आठ लक्ष पंचवीस हजार एकशे एकवीस मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |
| ८. | मौजे वाडा खडकवणे गाव अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | रु. ७८३०८९/- | अक्षरी रु. सात लक्ष त्र्याऐंशी हजार एकोणनव्वद मात्र. | आमदार स्थनिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२६ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची निविदा उपलब्ध कालावधी - दि.२६/११/२०२५ ते दि. ०३/१२/२०२५ पर्यंत

निविदा उघडणे - दि. ०८/१२/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.

जा.क्र. : सा.बां.वि./पालघर/निविदा/९४६२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : २१/११/२०२५

सही/-
(म.पा. किणी)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

विमाका/कोवि/२०२५-२०२६/२२१

24 TO 30 NOVEMER 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 11/22/2025 8:49 PM Page 1



# निवडणुकीतील भाजपची घराणेशाही!

रोज उठून कॉंग्रेसवर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या भाजपवाल्यांना आता त्यांच्याच पक्षातील घराणेशाही बघण्याची वेळ आली आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा मुलगा सुजय विखे पाटील खासदार बनला होता. ही घराणेशाही नाही का? नारायण राणेंचा एक मुलगा आमदार तर दुसरा मंत्री ही घराणेशाही नाही का? महायुतीतील ज्येष्ठ मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवित आहेत. ही घराणेशाही नाही का? चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री फडणवीस यांचा मामेभाऊ बिनविरोध निवडून आला ही घराणेशाही नाही का? नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने एकाच कुटुंबातील तब्बल सहा जणांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. नगराध्यक्ष पदासह एकाच कुटुंबातील सहा उमेदवारांना तिकीट देण्याच्या या निर्णयावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. आता नगराध्यक्ष पदाचे भाजपचे उमेदवार गजानन सूर्यवंशी यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. पक्षाच्या ठरवून दिलेल्या निकषांमध्ये हे उमेदवार बसत असल्याने त्यांना उमेदवारी मिळाली आहे. यामुळे पक्षातील कोणीही कार्यकर्ता यामुळे नाराज नाही, असे गजानन सूर्यवंशी यांनी म्हटले आहे.गजानन सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सहा उमेदवारांपैकी अनेक जण १९९५ पासून नगरसेवक राहिले आहेत. त्यांनी आपापल्या भागाचे सातत्याने प्रतिनिधित्व केले आहे. लोहा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी मला संधी मिळाली आहे. मी विकासाच्या मुद्द्यावर, मागे केलेले काम आणि पुढे करणारे काम जनतेसमोर ठेवत आहे. माझ्या कुटुंबातील ६ उमेदवार रिंगणात असले तरी यापूर्वी ते नगरसेवक होते. त्यांनी त्या त्या भागाचे नेतृत्व केले आहे. १९९५ पासून त्या त्या भागाचे नेतृत्व सूर्यवंशी घराण्याने केले आहे, असे सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. यावेळी गजानन सूर्यवंशी यांच्या आरोपांना उत्तर देताना त्यांनी भाजपच्या कठोर निकषांकडे लक्ष वेधले. पक्षाकडे कोणत्याही उमेदवाराची मागणी नव्हती. पण या ठिकाणाहून दुसऱ्या कोणाचा अर्जही आला नाही. त्यामुळे पक्षाने उमेदवारांसाठी जे निकष ठरवले होते, त्या निकषांमध्ये जे बसले त्यांनाच उमेदवारी दिली आहे, असे गजानन सूर्यवंशी यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या संभाव्य आव्हानाबद्दल गजानन सूर्यवंशी यांनी विश्वास व्यक्त केला. लोहा शहरात भाजप नेहमीच मजबूत राहिली आहे आणि भविष्यातही राहील. लोहामध्ये भारतीय जनता पार्टी कालही मजबूत होती, आजही मजबूत आहे आणि उद्याही मजबूत राहणार आहे. आम्ही जे उमेदवार दिले आहेत, त्याला लोहा शहरातील जनता सातत्याने आशीर्वाद देत आहे, असेही त्यांनी म्हटले. गजानन सूर्यवंशी यांनी लोहा शहराच्या विकासाची रूपरेषा मांडली. यावेळी त्यांनी अंडरग्राउंड ड्रेनेजचा प्रश्न, पार्किंग, गार्डन, प्लेग्राउंड आणि अन्य अंतर्गत सुविधांसारखी अनेक कामे हाती घ्यायची आहेत. लोहा शहरातील जनता भारतीय जनता पार्टी सोबत आहे, कोण कोणाला ताकद लावतो, याच्याकडे मी कधी बघितलं नाही आणि बघणारही नाही, असे गजानन सूर्यवंशी म्हणाले. विकासाच्या मुद्यावर लोहा नगरपालिकेवर भाजपाची सत्ता येईल आणि ३ तारखेला येत्या २ तारखेला होणाऱ्या २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतीच्या निवडणुकीत भाजपा नेत्यांचे अनेक नातेवाईक निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आणि भाजपा नेते गजानन सूर्यवंशी यांनी भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. निवडणुकीच्या रिंगणात जे पराजय ठरलेला असतो पण दुसऱ्यावर घराणेशाहीचा आरोप करणारे भाजपवाले आपल्या पक्षातील घराणेशाही बद्दल गप्प आहेत यालाच म्हणतात आपले ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे बघायचे वाकून!सर्वात महत्वाच म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भलेही ३ डिसेंबरला असल्या तरी भाजपाचे १०० लोक अगोदरच बिनविरोध निवडून आले आहेत. हा सगळा प्रकार काहीसा अनपेक्षित आणि तितकाच चमत्कारिक आहे .पण शेवटी जितकी लाठी उनकी भैस या म्हणीनुसार केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता असल्याने निवडणूक आयोग सुधा त्याच्या ताब्यात आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडे जाऊनही उपयोग नाही. पण अशा पद्धतीने सत्तेच्या जोरावर जर कुणी आपलीच माणसे बिनविरोध निवडून आणू लागले तर या देशात निवडणूक प्रक्रिया राहणारच नाही. परिणामी लोकशीचा एक प्रकारे मुडदाच पाडला जात आहे आणि म्हणूनच लोकांनी सावध व्हायला हवे या प्रकाराला विरोध करायला हवा.

# बिरसा मुंडा : भारतीय स्वतंत्र्याचा दीपस्तंभ

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्वे अशी आहेत ज्यांचे योगदान केवळ संघर्षा पुरते मर्यादित नसून त्यांनी एका समाजाला एका संस्कृतीला आणि एका युगाला नव संजीवनी दिली. त्यात 'धरती आबा' म्हणून ओळखले जाणारे महाक्रांतीकारक समाज सुधारक जननायक बिरसा मुंडा हे आदरांने उच्चारलेजाते त्यांच्या वडिलांचे नाव सुगाम मुंडा आईचे नाव करमी हातु यांच्या पोटी १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड मधील छोटा नागपूर पठारातील आलीहातू या छोट्याशा गावात जन्मलेल्या या महान योध्याने केवळ आदिवासींच्या अधिकारासाठी लढा दिला नाही तर भारत देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे . यंदा आपण त्यांच्या १५०व्या जयंतीचा उत्सव साजरा करीत आहोत हा केवळ स्मरणाचा क्षण नाही तर त्यांचा आदर्श विचार आणि लढ्याच्या परंपरेचा पुनर्जागरण करण्याचा दिवस आहे.



बिरसा मुंडा हे ज्या काळात जन्मले तो काळ भारतावर ब्रिटिशांच्या वर्चस्वचा होता ब्रिटिशांनी देशातील जनतेला राजकीय सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या जखडून ठेवले होते विशेषतः झारखंड ओडिशा बिहार या भागातील आदिवासी समाजावर ब्रिटिश शासन जमीनदार आणि महाजन त्रिकुटाणे अत्याचारांचा डोंगर कोसळला होता. त्यांच्या जमिनी हिसकावल्या जात होत्या पिढ्यानपिढ्या शेती करून उपजीविका करणारे हे लोक बेघर होत होते आणि त्यांना गुलामगिरीच्या गर्तेत ढकलले जात होते अशा अंधकारमय परिस्थितीत या समाजाच्या हृदयातून एक ज्वाला पेटली होती आणि ती ज्वाला होती बिरसा मुंडाची. बिरसा मुंडा यांनी आपल्या विचाराद्वारे आदिवासी समाजात जागृती निर्माण केली त्यांनी सांगितले की आपली जमीन आपले जंगल आणि आपले पाणी हेच आपले जीवन आहे त्यांनी आदिवासींना गुलामीच्या बेड्यातून मुक्त करण्यासाठी शिक्षण आत्मनिर्भरता आणि संघटनेचे महत्त्व पटवून दिले धरती आबा म्हणून लोक त्यांना मानू लागले कारण त्यांनी आपल्या मातृभूमीला माता समजले आणि तिचे रक्षण करणे हेच आपला धर्म मानले त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने आपल्या स्वतंत्र धर्म संस्कृती आणि ओळख टिकून ठेवण्यासाठी एक व्यापक चळवळ उभारली होती. बिरसा मुंडाणे छोटा नागपूर प्रदेशात मुंडा आंदोलन उभारले या आंदोलनाचे घोषवाक्य होते अबुवादिशुम अबुवा राजा म्हणजे आपली जमीन आपले राज्य त्यांनी आपल्या अनुयायांना हिंसाचारापेक्षा आत्मसन्मानाची लढाई लढण्यास प्रेरित केले ब्रिटिश सरकारच्या शोषण कारी भूमी सुधार कायद्याविरोधात त्यांनी जमिनीचे रक्षण करण्यासाठी जनतेला संघटित केले या बंडाने ब्रिटिश सरकार हादरून गेले बिरसा मुंडा हे केवळ स्थानिक नायक राहिले नाहीत तर ते भारतातील पहिल्या स्वातंत्र्यवीरांच्या श्रेणीत स्थान मिळवून गेले. बिरसा च्या विचारसरणीत समाज सुधारण्याचे तत्वही स्पष्ट दिसते त्यांनी आपल्या समाजातील अंधश्रद्धा मध्येपान जादूटोणा आणि भोंदू पणाविरुद्ध तीव्र आवाज उठवला त्यांना वाटत होते की जोपर्यंत आदिवासी समाज स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणत नाही तोपर्यंत बाहेरील अत्याचाराला तोंड देता येणार नाही म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना स्वयम सत्य आणि परिश्रमाचे शिक्षण दिले त्यांनी आदिवासी धर्माला एक नैतिक चौकटीत बांधून सामाजिक एकता प्रस्थापित केली. त्यांचे विचार फक्त समाज परिवर्तनापुरते मर्यादित नव्हते तर त्यात स्वातंत्र्याचा गाभा होता त्यांनी सांगितले की इंग्रज सरकार ही आपल्या भूमीवरील परकी सत्ता आहे आणि तिचे उच्चाटन हे आपले परम कर्तव्य आहे या विचाराने पुढील स्वतंत्र्यसंग्रामातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली गांधीजीच्या सत्याग्रह आणि स्वावलंबन या तत्वापूर्वीच बिरसा मुंडाणे स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा संदेश आपल्या लोकांना दिला होता. मध्ये ब्रिटिशांनी त्यांना अटक करून तुरुंगात डांबले परंतु त्यांची क्रांतीची ज्योत विझली नाही तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या अनुयायांना संघटित केले मात्र ब्रिटिश सरकारला त्यांचा प्रभाव सहन झाला नाही १९०० मध्ये त्यांना पुन्हा अटक करण्यात आली आणि ९ जून १९ ००रोजी रांचीच्या तुरुंगात त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला तेव्हा त्यांचे वय फक्त २५ वर्षाचे होते पण या तुरुंगात क्रांतिकारकाने अल्प आयुष्यात केलेले कार्य भारतीय इतिहासात अमर झाले. बिरसा मुंडा यांच्या बलिदानाने आदिवासी समाजात नवचेतना निर्माण झाली ब्रिटिश सरकारला अखेर छोटा नागपूर टेनन्सी ऍक्ट मंजूर करावा लागला ज्यामुळे आदिवासींच्या जमिनीचे संरक्षण झाले. हा कायदा आधी त्यांच्या लढ्याचे फलस्वरूप म्हणून ओळखला जातो त्यांच्या आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवा सामाजिक पाया दिला गेला स्वराज्य हा केवळ राजकीय संकल्प नाही तर तो सामाजिक आर्थिक आणि संस्कृतिक मुक्तीचाही मार्ग आहे हे बिरसाने दाखवून दिले. आज बिरसा मुंडा हे केवळ एका आदिवासी समाजाचे नायक राहिलेले नाहीत ते भारताच्या सामाजिक न्यायाच्या समतेच्या आणि स्वाभिमानाच्या चळवळीचे प्रतीक झाले आहेत १५ नोव्हेंबर हा दिवस आज जनजातीय गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ आदरांजली देण्याचा नाही तर त्यांच्या आदर्शावर चालण्याचा आहे त्यांनी शिकवलेली एकता परिश्रम आणि स्वाभिमानाची शिकवण आजही भारताला नवी दिशा देते त्यांचा लढा केवळ ब्रिटिशा विरुद्ध नव्हता तर शतकान व शतके चालत आलेल्या शोषणाच्या व्यवस्थेविरुद्ध होतात त्यांनी समाजातील दुर्लक्षित वर्गांना आत्मसन्मानाचीजाणीव करून दिली आज जेव्हा आपण सबका साथ सबका विकास याची चर्चा करतो तेव्हा बिरसा मुंडा चे विचार त्यामागे जिवंतपणे उभे दिसतात त्यांच्या जीवनातून आपल्याला समजते की सामाजिक न्याय आणि स्वातंत्र्य हे हातात हात घालून चालतात. भारतीय लोकशाहीचा आत्मा म्हणजे समानता स्वातंत्र्य आणि बंधुता होय बिरसा मुंडा यांनी या तीनही मूल्यांचे बीज आपल्या संघर्षातून रवले त्यांच्या प्रेरणेने आज अनेक आदिवासी तरुण शिक्षण रोजगार आणि राजकारणाच्या क्षेत्रात पुढे येत आहेत केंद्र आणि राज्य सरकारने त्यांच्या नावाने विद्यापीठे संग्रहालय स्मारके उभारले आहेत पण खरी आदरांजली तीच जेव्हा आपण त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरू शोषणमुक्त समाज पर्यावरण संवर्धन स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची दिशा स्वीकारू. आजच्या काळात जेव्हा जागतीकरणाच्या युगात आदिवासी समाज पुन्हा आर्थिक आणि संस्कृतीक आव्हानांना सामोरे जात आहे तेव्हा बिरसा मुंडा चा संदेश पुन्हा नव्याने स्मरणात आणण्याची गरज आहे त्यांनी सांगितले होते की धरती ही आई आहे त्याचे रक्षण हेच आपला धर्म आहे हा विचार आज पर्यावरणीय संघटना संकटाच्या काळात अत्यंत महत्त्वाचा ठरतो त्यांनी दाखवून दिले की खरी प्रगती तीच जे निसर्गाशी सुसंवाद राखतो बिसरा मुंडा यांचे जीवन म्हणजे क्रांती अध्यात्म आणि सामाजिक न्याय यांचा त्रिवेणी संगम होते त्यांचा संघर्ष हे दाखवतो की एका तरुणाच्या धैर्याने संपूर्ण व्यवस्था हादरून टाकतायेते जर त्याच्या मनात जनतेसाठी प्रेम आणि न्यायाची ज्वाला असेल तर त्यांनी आपल्या अल्प आयुष्यात जे कार्य केले ते आजही भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे. आखेर बिरसा मुंडा हे केवळ एक ऐतिहासिक व्यक्तिमत्व नाहीत तर ते भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासातील जिवंत प्रतिक आहेत त्यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आपण त्यांना केवळ स्मरणात ठेवू नये तर त्यांच्या आदर्श नुसार वर्तन करावे कारण बिरसा मुंडा म्हणजे स्वाभिमानाची मूर्ती अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक आणि भारताच्या स्वत्वाचा निखळ दीपस्तंभ होते त्यांचा विचार भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सदैव द्वीप स्तंभा सारखा उजळत राहील देशासाठी समाजासाठी आणि प्रत्येक माणसासाठी जो न्याय आणि समानतेसाठी झगडत आहे अशा या महान क्रांतिकारी नेत्याला क्राइम संध्या परिवाराच्या वतीने मानाचा मुजरा.

**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

# केवायसी नसल्यामुळे शेतकरी शासकीय अनुदान प्रलंबित!

**पालघर : वार्ताहर**



अवकाळी पाऊस तसेच खरीप हंगामात होणाऱ्या अतिवृष्टी, पूरजन्य परिस्थितीमुळे बाधित होणाऱ्या शेतकरी व बागायतदारांना शासनाकडून विशेष मदत पॅकेज (अनुदान) ची घोषणा गेल्या काही वर्षात अनेकदा झाली असली तरीही शेतकऱ्यांच्या स्वतःच्या तपशील पडताळणी अर्थात केवायसी प्रकिया पूर्ण होत नसल्याने जिल्ह्यातील किमान २७ हजार शेतकरी अजूनही अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अतिवृष्टी व इतर कारणांमुळे जिरायत, बागायत क्षेत्रातील शेती पिकांचे होणारे नुकसान तसेच बहुवार्षिक पिक (फळबाग) क्षेत्रांमध्ये होणाऱ्या नुकसानीच्या अनुषंगाने बाधितांना राज्य सरकारने गेल्या काही वर्षांपासून अनेकदा विशेष मदत पॅकेजची घोषणा केली आहे. यामध्ये साडे आठ हजार रुपये प्रति हेक्टर ते ३२ हजार रुपये प्रति हेक्टर व क्षेत्रफळावर दोन ते तीन हेक्टर ची मर्यादा ठेवून राज्य सरकारने अनुदान पॅकेज जाहीर केली आहेत.

पालघर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागात व विशेषतः कोकणातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील अशा नैसर्गिक आपत्ती, वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस अथवा अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून अजूनही शासनाने देऊ केलेला लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला नाही अशी स्थिती आहे. जिल्ह्यातील २७ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांचे १० कोटींपेक्षा अधिक रक्कम शासनाकडून प्राप्त झाली नसल्याने गेली काही वर्षे सातत्याने लहरी हवामानाचा फटका बसणारे शेतकरी हवालदिल झाले आहेत. शासनाने अनुदानाची घोषणा केल्यानंतर बाधित असणाऱ्या क्षेत्रातील शेतकऱ्यांची नावे शासनाच्या आपत्ती नुकसान अनुदान संबंधित संकेतस्थळावर झळकतात. त्यानंतर शेतकऱ्यांनी स्वतःच्या हयात असल्याच्या तसेच अनुदान घेण्यासाठी स्वतःच्या पात्रतेच्या पडताळणी (खातर जमा करण्यासाठी) प्रत्येक अनुदानाच्या अनुषंगाने ग्राहक तपशील पडताळणी अर्थात केवायसी करणे अपेक्षित आहे. ठीक एवायसी जवळच्या आधार नोंदणी केंद्रावर किंवा आपले सरकार (सेवा) केंद्रांवर करणे शक्य असले तरीही स्थानीय पातळीवर असणाऱ्या इंटरनेटच्या मर्यादामुळे अडचणी निर्माण होतात. राज्यातील विविध भागातील बाधित शेतकऱ्यांकडून एकाच वेळा पडताळणीसाठी झुंबड उडत असल्याने संबंधित संकेतस्थळ कोलमडून जाणे अथवा बंद पडद्याचे प्रकार देखील घडले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून केलायसी होत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जून ते सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी, पूरहानी यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर झालेल्या विशेष पॅकेज मदतीची अजूनही सुमारे ४० टक्के शेतकरी प्रतिक्षेत असल्याचे दिसून आले. तर एप्रिल व मे २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसाच्या मुळे बाधित झालेल्या जिल्ह्यातील ७०४० शेतकऱ्यांपैकी ९० टक्के शेतकऱ्यांना अजूनही सुमारे पाच कोटी रुपये मिळणे प्रलंबित राहिले आहे. तसेच सन ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या वादळी वातावरणासह अतिवृष्टीमुळे शासनाने देऊ केलेले प्रति हेक्टर ३२ हजार रुपयांचे अनुदान अजूनही डहाणू व तलासरी तालुक्यातील अनेक बागायतदारांना प्राप्त झाले नाही. या संदर्भात या शेतकऱ्यांनी केवायसी तातडीने पूर्ण केले मात्र निधी वितरणाच्या सद्यस्थितीबाबत संकेतस्थळावर विचारणा केल्यानंतर स्थानिक तहसील कार्यालयाशी संपर्क साधण्या संदर्भात सूचना मिळत आहेत. अधिक अनुदानास पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांची पुनर्र पडताळणी करण्याचे शासनाने सूचित केले असताना ही प्रकिया देखील प्रलंबित राहिल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे स्थानिय महसूल कार्यालयात या संदर्भात विशेष कोणतीच माहिती प्राप्त नसून या प्रकरणात पाठपुरावा कोणी व कुठे करावा याबाबत शेतकरी देखील गोंधळलेल्या स्थितीत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे शेतकऱ्यांनी निवेदन दिल्यानंतर त्याचा विशेष लाभ झाला नसल्याचे शेतकरी वर्गाकडून सांगण्यात येत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीचे तसेच वैयक्तिक माहिती एकत्रित करून वेगवेगळ्या कृषी संबंधित कामांसाठी वारंवार आवश्यक असणारी माहिती संकलित करण्याची ग्रीस्टॅक ही महत्त्वाकांक्षी योजना अमलात आणली. जिल्ह्यातील १००८ गावांमधील एक लाख ५३ हजार ५८८ शेतकरी (खातेदार) संख्या असून त्यापैकी ८९.७३ टक्के (१.२६ लक्ष) शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक योजनेत आपली नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांची ग्रीस्टॅक प्रणालीत नोंदणी झाली असताना त्यापैकी अवघ्या ४९ हजार शेतकऱ्यांना ऑक्टोबर २०२५ च्या अनुदान विषयक शासन निर्णयाच्या (७.५२ कोटी रुपये) लाभ मिळाला आहे. त्यामुळे या व इतर शासकीय अनुदानासाठी पात्र असणाऱ्या व ग्रीस्टॅक ची पूर्तता केल्यानंतर देखील अनेक शेतकरी शासनाच्या अनुदानापासून वंचित राहिले आहेत. या संदर्भात आपत्ती मदत विभागाकडे केवायसी करणारे संकेत स्थळ कार्यरत कधी राहील याबद्दलचा तपशील प्राप्त होत नसून शासनाकडून अनुदानासाठी निवडल्या जाणाऱ्या प्रत्येक लाभार्थी ला त्यांच्या बँक खात्यात अनुदान रक्कम जमा करण्यापूर्वी वैयक्तिक पडताळणी करणे आवश्यक बाब असल्याचे भूमिका असल्याचे शेतकऱ्यांना सांगितले जात आहे. त्यामुळे एक तर कृषी विषयी सर्व बाबींसाठी ग्रीस्टॅक नोंदणीचा सारासार वापर करणे, संकेतस्थळ बळकटीकरण करण्यासाठी व्यवस्था करणे अथवा जिल्हा व तालुका स्तरावरील लाभार्थ्यांसाठी स्वतंत्र संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक झाले आहे. अतिवृष्टी अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी व बागायतदारांचे होणाऱ्या नुकसानापैकी शासनाकडून मिळणारी मदत ही तूटपुंज असते. मात्र त्याचा आधार घेऊन शेतकरी पुन्हा पुढच्या हंगामात उभा राहत असतो. अशा परिस्थितीत शासकीय अनुदानाच्या प्रतीक्षेसाठी सहा ते आठ महिने घालवावे लागत असल्यास जिल्ह्यातील कृषी व्यवस्था कोलमडून जाईल व कृषी प्रधान असणाऱ्या पालघर जिल्ह्यातील हिरवळ काही काळाने पूर्णपणे नष्ट होईल अशी स्थिती निर्माण झाली आहे.

# विरार-अलिबाग मार्गिकेमुळे ठाणे, कल्याण, नवी मुंबईची वाहतूक कोंडी सुटणार!

**मुंबई : वार्ताहर**

ठाणे, भिवंडी, कल्याण आणि नवी मुंबईतीलवाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या बहुप्रतिक्षित विरार-अलिबाग बहुद्देशीय मार्गिकेचे काम बांधा वापरा हस्तांतरित करार (बीओटी) तत्वावर करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची मंजुरी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नुकतीच राज्य सरकारकडे मागितली. त्याला मंजुरी मिळाली तर प्रकल्पाच्या बांधकामासाठी निविदा काढल्या जाणार आहेत, अशी माहिती एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली. एमएसआरडीसीने या महामार्गाच्या कामासाठी यापूर्वी निविदा काढल्या होत्या. मात्र त्या निविदा ३६ टक्के अधिक दराने आल्या होत्या. तसेच त्यावर मोठी टीका झाली होती. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी या निविदा रद्द करून हा प्रकल्प बीओटीवर राबविण्याची सूचना राज्य सरकारने केली होती. त्यानुसार एमएसआरडीसीने प्रकल्प बीओटी तत्वावर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या निविदेच्या अटी शर्ती मंजुरीसाठी सरकारकडे पाठविल्या आहे. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेवरून आलेल्या वाहनांना थेट जेएनपीटीला पोहचता येणार आहे. मात्र या दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेचा मोरबे ते करंजाडे हा २१ किमी लांबीचा मार्ग विरार-अलिबाग महामार्गासोबत एकत्र उभारला जाणार आहे. एमएसआरडीसी या २१ किमी मार्गाचे काम करणार आहे. मात्र सध्या दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेचे राज्यातील ८० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे मोरबे ते करंजाडे मार्गाचे काम दोन वर्षांत पूर्ण करण्याची अट निविदेत घातली जाईल, अशी माहिती एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. विरार-अलिबाग हा ९६.५ किमी लांबीचा बहुद्देशीय मार्ग मुंबई महानगरातील पहिला प्रवेश नियंत्रित महामार्ग असेल. एमएसआरडीसी तो उभारणार असून ५३ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. वसई येथील राष्ट्रीय महामार्ग ८ वरील नवघर येथून तो सुरू होईल. तर पेण तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील बलावली गावादरम्यान हा मार्ग असेल. त्याच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी ४ मार्गिका उभारल्या जाणार असून मुंबई आणि दिल्ली एक्स्प्रेसवेचा काही भाग आणि हा महामार्ग एकत्रित जाणार आहे. या भागात रस्त्यावर प्रत्येकी एका दिशेच्या वाहतुकीसाठी ६ मार्गिकांचा रस्ता उभारला जाणार आहे. त्यातून मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल. मार्गाच्या कामासाठी आलेल्या निविदापत्राची पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी नेमलेल्या समितीकडून तपासणी सुरू आहे. त्यांनी मंजुरी दिल्यानंतर एमएसआरडीसीकडून निविदा काढल्या जाणार आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# शिक्षकाच्या मारहाणीच्या धाकाने विद्यार्थी लपले जंगलात

## पालघरमधील जांभुळमाथा येथील धक्कादायक घटना




**पालघर : वार्ताहर**

शिक्षक विद्यार्थ्यांना पाणी आणण्यासाठी बाहेर पाठवतात. उशिर झाला म्हणून बेदम मारहाण करतात, हे सर्व चित्र पाहून शाळेतील इतर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकाबद्दल भीती निर्माण झाली आणि विद्यार्थ्यांनी शाळेत जाणेही नको आणि शिक्षकांचा विनाकारण मारही खायचा नाही, यासाठी शक्कल लढवली आणि जंगलात लपून बसू लागले. ही धक्कादायक घटना पालघर जिल्ह्यातील जव्हार येथे घडली आहे. जव्हार तालुक्यातील जांभूळमाथा येथील प्राथमिक शाळेतील शिक्षक लोकनाथ जाधव यांनी शुक्रवारी (१४ नोव्हेंबर) काही विद्यार्थ्यांना झऱ्यावरुन पाणी आणण्यासाठी दोन किलोमीटर लांब पाठवले होते. पाणी घेऊन येण्यासाठी विद्यार्थ्यांना उशिर झाला. यामुळे शिक्षक जाधव यांनी चार ते पाच विद्यार्थ्यांना मारहाण केली. सहकारी विद्यार्थ्यांना झालेली मारहाण पाहून शाळेतील इतर विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकाबद्दल दहशत निर्माण झाली. शिक्षक लोकनाथ जाधव हे कोणत्याही कारणाने आपल्यालाही मारहाण करतील, या भीतीने विद्यार्थ्यांनी शाळेत न जाता जंगलामध्ये लपून बसण्याचा पर्याय निवडला. ही गोष्ट पालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मारहाण करणारे शिक्षक लोकनाथ जाधव यांच्याविरोधात वरिष्ठांकडे तक्रार केली. विद्यार्थ्यांना शाळाबाह्य कामे सांगून त्यासाठी उशिर झाल्याने त्यांना मारहाण करणाऱ्या शिक्षकाविरोधात ग्रामस्थांनी गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे तक्रार केली. मात्र वरिष्ठांकडून कोणतीही कारवाई न झाल्यामुळे पालकांनी ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. जव्हार तालुक्यातील जांभुळमाथा येथे जिल्हा परिषद शाळेत पहिली ते आठवीपर्यंचे वर्ग आहेत. या शाळेमध्ये ९६ विद्यार्थी असून लोकनाथ जाधव हे शिक्षक आहेत. शाळेमध्ये उशिरा येणे, आल्यानंतर मोबाईलमध्येच पाहात राहणे. शिक्षक जाधव हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे सर्रास दुर्लक्ष करत असल्याची तक्रार याआधीही ग्रामपंचायतीकडून करण्यात आली आहे. याशिवाय शनिवारी शिक्षक शाळेतच येत नसल्याचीही तक्रार पालकांनी केली आहे. उपसरपंच सुभाष भोरे यांनी गटशिक्षणाधिकारी यांना १७ नोव्हेंबर रोजी निवदेन देऊन शिक्षक लोकनाथ जाधव यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. गटशिक्षणाधिकारी, जव्हार पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामस्थांच्या या तक्रारीकडे लक्ष देतात का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# भिवंडीत नशेसाठी औषधी बाटल्यांची बेकायदा विक्री

**भिवंडी : वार्ताहर**

गुंगीच्या औषधासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधी बाटल्यांची विक्रीसाठी बेकायदा वाहतूक करणाऱ्या दुकलीला शांतीनगर पोलिसांनी ताब्यात घेवून बेड्या ठोकल्या आहेत. सैफुददीन इब्राहिम कपासी (५२) आणि दानिश शहा अंन्सारी (३५) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी सव्वा दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस पथक रविवारी १६ नोव्हेंबर रोजी चाविंद्रा रोडवरील सोनाबाई कंपाऊंड जवळ पेट्रोलिंग करीत असताना पोलिसांना वरील दोन्ही आरोपी संशयित रित्या ऑटो रिक्षातून वाहतूक करताना आढळले. त्यांची झाडझडती घेतली असता त्यांच्याकडे कोडीन फॉस्फेट आणि ट्रीप्रोलीडीन एचसीएल कफ सिरप बॉटल आढळल्या. ७७ हजार ८५० रुपये किमतीच्या ३ बॉक्स त्यामध्ये एकूण ३४६ बाटल्या होत्या. यातील औषध मानवी शरीरास हानिकारक आणि गुंगीकारक असल्याचे माहिती असतानाही या बॉटल्स बेकायदारित्या त्यांनी जवळ बाळगल्या होत्या. या बॉटल्स रित्या विक्रीसाठी घेवून जात असल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यामुळे आरोपींकडून रिक्षासह रोख रक्कम, २ मोबाईल असा एकूण २ लाख २५ हजार २५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांच्या विरोधात पोलीस शिपाई नाजीम नजिर शेख यांच्या फिर्यादीवरून शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे. या दोन आरोपींना पुढील कारवाईसाठी न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे करीत आहेत. मात्र गुंगीच्या औषधासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधी बाटल्यांची विक्रीवर प्रतिबंध लागला पाहिजे.

# लातूर पालिकेच्या उपायुक्त वसुधा फड यांनी स्वच्छता विभागाच्या कामाचा घेतला आढावा




**लातूर : वार्ताहर**

लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी याच्या आदेशानुसार नवनियुक्त उपायुक्त वसुधा फड यांनी स्वच्छता विभागाचा नुकताच पदभार घेतला आहे त्यांनी स्वच्छता विभागातील अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, कंत्राटदार यांच्या कडून दैनंदिन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील नेहमी कचरा पडणारी ठिकाणाचे (GVP Point) सुशोभीकरण करण्यासाठी स्वच्छता निरीक्षक यांनी नाविण्यापुर्वक कल्पना सुचवणे व त्या अंमलात आणणेबाबत निर्देश देण्यात आले. शहरातील मुख्य रस्त्यावरील साफसफाई सकाळी ९ च्या आगोदर झाली पाहिजे असे ठेकेदाराला निर्देश दिले. शहरातील मोकळ्या जागेत, रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही करणे. घरामधून ओला, सुका कचरा विलगीकरण करून न देणाऱ्या नागरिकांमध्ये जनजागृतीचे कार्यक्रम घेण्याचे सांगण्यात आले. सदरील बैठकीस मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, शहर समन्वयक रोहित पांचाळ यांच्यासह इतर स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी उपस्थित होते. लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी याच्या आदेशानुसार लातूर शहरामध्ये सिंगल युज प्लास्टिक बंदीची मोहीम राबविण्यात असताना सिंगल युज प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदार, विक्रेते, फुल विक्रेते, स्थानिक बाजारपेठा, भाजीपाला मंडई, आस्थापना यांची तपासणी करण्यात आली त्यात एकूण ११० आस्थापानाची झडती घेण्यात आली तसेच दुकानदारांना १६५०० दंड आणि एकूण २०० किलो सिंगल युज प्लास्टिक जप्ती करण्यात आले.

# देवणी ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी




**देवणी : वार्ताहर**

सीमावर्ती देवणी तालुक्यात वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे तात्काळ वैद्यकीय उपचारांची गरज दिवसेंदिवस तीव्र होत आहे. याच पार्श्वभूमीवर देवणी नगर पंचायतीच्या वतीने येथील ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे अधिकृतरीत्या करण्यात आली आहे. देवणी शहरातून राज्यमार्ग जात असल्याने वाहतूक मोठ्या प्रमाणावर असून गायी-गुरांचा मोठा बाजारही इथे भरतो. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा व मध्यप्रदेशातून शेतकरी आणि गोपालक येथे येत असल्यामुळे येथील लोकसंख्या व गर्दी मोठी असते. परंतु त्याला साजेशी आरोग्य यंत्रणा नसल्याने गंभीर रुग्णांना तातडीचे उपचार मिळण्यात अडथळे येत आहेत. सध्या देवणी तालुक्यात ग्रामीण रुग्णालय, बोरोळ व वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच सात-आठ उपकेंद्रे कार्यरत आहेत. मात्र वाढत्या रुग्णभाराच्या तुलनेत सुविधा अपुऱ्या आहेत. अपघातातील गंभीर रुग्णांना आवश्यक उपचार येथे उपलब्ध नसल्याने त्यांना लातूर, सोलापूर, हैदराबाद, पुणे अशा दूरच्या मोठ्या शहरांत हलवावे लागते. यात विलंब, अतिरिक्त खर्च आणि काही वेळा जीवितहानीही होते. उपकेंद्रांमध्ये केवळ प्राथमिक उपचार केल्यानंतरच रुग्णांना पुढे पाठवले जाते, ज्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. ट्रॉमा केअर सेंटर सुरू झाल्यास सर्जन, फिजिशियन, आर्थोपेडिक, न्यूरो स्पेशालिस्ट, महिला तज्ज्ञ, नर्सेस तसेच इतर आवश्यक वैद्यकीय कर्मचारी २४ तास उपलब्ध राहतील. अद्ययावत यंत्रसामग्री आणि तातडीचे उपचार मिळाल्यास अपघातातील तसेच आपत्कालीन रुग्णांचे प्राण वाचण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढेल. ग्रामीण रुग्णालयात आवश्यक इमारतीची उपलब्धता असल्याने सरकारला या केंद्राच्या स्थापनेवरही कमी खर्च येणार असल्याचे नगर पंचायतीने पत्रात नमूद केले आहे.

# वलांडी येथे उमूमी ईज्तेमाची बैठक संपन्न

**देवणी : वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षापासून देवणी तालुक्यातील वलांडी व परिसरातील मुस्लिम बांधवांना अपेक्षित असलेल्या उमूमी इज्तेमाचे आयोजन अखेर निश्चित झाले आहे. येणाऱ्या नवीन वर्षात ७ व ८ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या या दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक उस्मानिया फंक्शन हॉल येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी लातूर येथील प्रमूख हाजी अन्सार अमीर साहब यांच्या मार्गदर्शनाखाली ईज्तेमाची जागा निश्चित करण्यात आली.या बैठकीसाठी उदगीर येथील प्रमूख मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इस्तेमाच्या संपूर्ण नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला वलांडीसह परिसरातील ७ केंद्रांतील तब्बल ८८ मस्जिदींचे प्रमुख व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उदगीर, देवणी, वलांडी, गुरुनाळ, मोघा, कमालनगर आदी गावांतील मस्जिद प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवला. इज्तेमासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधांची जबाबदारी उपस्थितांनी आपापल्या परीने स्वीकारली असून कार्यक्रम निर्विघ्न पार पडावा यासाठी सर्वांनी एकदिलाने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या महत्त्वपूर्ण बैठकीचे संपूर्ण नियोजन वलांडीतील इस्लाम धर्मीय तरुण मंडळींनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले असून, आगामी उमूमी इज्तेमासाठी वलांडी गावात उत्सुकता आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# वलांडी येथे हजरत टीपू सुलतान जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

**देवणी : वार्ताहर**



हजरत टीपू सुलतान यांची जयंती वलांडी येथे उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामस्थ, युवा मंडळे व सामाजिक बांधवांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाची सुरुवात हजरत टीपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. या वेळी लोकजागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव पाटील, उपसरपंच महेमूद सौदागर,माजी सरपंच राम भंडारे, सेवा निवृत्त उपविभागीय अभियंता रफीक सौदागर, माजी उपसरपंच दिनेश पाटील, अरुण पाटील, विलास वाघमारे, हकीम बौडीवाले, मुस्ताक कादरी यांच्यासह सर्व धर्मीय नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जयंतीचे औचित्य साधून सुमारे २०० लिटर दूध-सरबत वाटप करण्यात आले. याच निमित्ताने सतत डायलिसिसची गरज भासणाऱ्या कुमारी सान्विका रतन होनाळे या चिमुकलीस मदतीचा हात म्हणून भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. लातूर ब्लड बँकेच्या नैन पाटील, राधाकिशन फड व टीमने विशेष परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी केले. या शिबिरात ४० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी निभावली. त्यानंतर मान्यवरांनी टीपू सुलतान यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेची आठवण करून देणारी मनोगते व्यक्त केली. गावातील वरिष्ठ मंडळी, धार्मिक व्यक्ती व कार्यकर्त्यांनी सामाजिक सलोखा व एकतेचा संदेश देत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमादरम्यान शांतता, बांधिलकी आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे उपक्रम राबविण्यात आले. उपस्थितांनी टीपू सुलतान यांच्या आदर्शावर चालण्याची प्रतिज्ञा केली. जयंती कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडला. नागरिकांच्या सहकार्याबद्दल आयोजक समितीने सर्वाचे मनःपूर्वक आभार मानले. या जयंती समितीचे अध्यक्ष मजरोद्दीन बौडीवाले, उपाध्यक्ष दाऊद तांबोळी, सचिव मिनाज सय्यद, सदस्य बाबूलाल पठाण, यूनुस नरोने, यासीन मूंजेवार यांच्यासह हजरत टिपू सुलतान विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष अक्रम शेख, उपाध्यक्ष हमीद तांबोळी, सचिव तौफीक जमिंदार, तसेच अहेमद पठाण, रहीम शेख, मन्नान शेख, साजिद पठाण आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# बोईसर चिल्हार मार्गावर वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**बोईसर : वार्ताहर**

बोईसर चिल्हार मार्गावर अज्ञात वाहनाचे धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. या अपघात प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अपघात करून पळून गेलेल्या वाहनाचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. बोईसर-चिल्हार मार्गावर सोमवारी सकाळी मान येथील शुभलक्ष्मी कोनार (३८) या महिलेचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. टाटा हाऊसिंग परिसरातील दुकानात कामावर जात असताना एका दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली. धडकेमुळे त्या रस्त्यावर पडल्या आणि त्याचवेळी बोईसरकडे जाणारा ट्रक अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बोईसर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेहाला शवविच्छेदनासाठी तारापूर आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला आहे. महिलेला धडक दिल्यानंतर दुचाकीस्वार फरार झाला असून ट्रकचालकानेही वाहन घटनास्थळी सोडून पलायन केले आहे. घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पुढील तपास सुरू असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. मुंबई अहमदाबाद महामार्ग ते तारापूर औद्योगिक क्षेत्राला जोडणारा १६ किमी अंतराचा बोईसर चिल्हार मार्ग वाहन चालकांसाठी सध्या मृत्यूचा सापळा ठरत आहे. दैनंदिन जवळपास ३५ ते ४० हजार वाहनांची प्रचंड वर्दळ या मार्गावरून होत असून पावसाळ्यात रस्त्याची दुरवस्था झाल्याने वारंवार अपघाती घटना घडत आहेत. चौपदरी मार्गावर नागझरी ते खैरापाडा दरम्यान दुतर्फा दुकाने, व्यावसायिक गाळे आणि गोदामांच्या झालेल्या अतिक्रमणामुळे पायी चालण्यासाठी पदपथ नसल्याने नागरिकांना नाईलाजाने मुख्य रस्त्यावरून चालण्याची वेळ येते. त्यामुळे अनेक वेळा वाहनांच्या धडके मुळे अपघाती घटना वाढत आहेत. या मार्गाची नियमित देखभाल दुरुस्ती करणे दुरुस्ती करणे एमआयडीसीच्या आवाक्याबाहेर जात असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्ता हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# दिव्यांग क्षेत्रात विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांचे आदेश

**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था कोणतीही नोंदणी न करता कार्यरत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून, अशा संस्थांनी कायदेशीर नोंदणी करणे बंधनकारक असल्याची माहिती जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी दिली. दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ ही नोंदणीसाठी अंतिम मुदत असून, त्यानंतर विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा त्यांनी इशारा दिला आहे. दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी संस्थांची नोंदणी अनिवार्य असल्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण आयुक्त यांना सक्षम अधिकारी घोषित करण्यात आले असून, त्यांच्याकडूनच नोंदणी प्रमाणपत्रे देण्यात येतात. अधिनियमातील कलम ५१ आणि ५२ नुसार दिव्यांग क्षेत्रात कोणतेही कार्य करण्यापूर्वी संस्थेची नोंदणी आवश्यक आहे. त्यानुसार पालघर जिल्ह्यातील सर्व संस्थांनी ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी नोंदणीचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, कलम ९१ नुसार विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही डॉ. हसनाळकर यांनी सांगितले. डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी संस्थांना आवाहन केले की, दिव्यांग बांधवांच्या हक्कांचे संरक्षण आणि पारदर्शक कामकाजासाठी नियमानुसार नोंदणी करून शासनाच्या प्रक्रियेस सहकार्य करावे.

## थोडक्यात वृत्तांत

### अखेर आशागड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई

डहाणू : प्राथमिक आरोग्य केंद्र आशागड येथील अनुपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कठोर कारवाई करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र अशागड (तालुका डहाणू) येथे वैद्यकीय अधिकारी कामावर अनुपस्थित असल्याबाबत विविध वृत्तपत्रे आणि सामाजिक माध्यमांवर बातमी प्रसिद्ध झाली होती. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या निर्देशानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी चौकशी समिती स्थापन केली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार घटनेच्या वेळी केंद्रातील एकही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याचे निष्पन्न झाले असून अहवालाच्या आधारे प्रशासनाने तात्काळ कडक पावले उचलली आहेत. कंत्राटी वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली मालवणकर आणि डॉ. कृतिका जनाठे यांची सेवा समाप्त करण्यात आली असून नियमित वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षितिजा पाटील यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. आरोग्य सेवा सुरळीत ठेवण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आशागडचा कार्यभार अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे.

### रक्तदान हेच महादान-डॉ.महेश शिंदे

लातूर : लातूर येथील प्रसिध्द मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटलचे प्रमुख डॉ.महेश शिंदे यांचा ३८ वा वाढदिवस रक्तदान व अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला. मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटल व संजीवनी ब्लड बॅक यांच्या संयुक्त विदयामाने साजरा करण्यात आलेल्या डॉ.शिंदे यांच्या जन्मदिनानिमीत ३० जणांनी रक्तदान केले. त्याच बरोबर शासकीय वैदयकीय महाविदयालय येथे गरजू पेशंटना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.शिंदे म्हणाले की, गरजू लोकापर्यत डॉक्टरचे जाणे गरजेचे असुन त्यांच्या अडचणी जाणुन घेतल्या पाहिजेत. भावी काळात गरजु व्यक्तींना व्यक्तीगत पातळीवर जी मदत लागेल ती मी उपल्बध करून देणार आहे असे प्रतिपादन केले. तसेच आजपर्यंत च्या वाटचालीत सोबत असलेले डॉक्टर, कर्मचारी यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

### अल्ताफ मोहम्मद हुसेन यांचे निधन



विरार : राष्ट्र सेवा दल, समाजवादी पार्टी, भारतीय संविधान जनजागृती अभियान तसेच फेरीवाला संघाचे खंदे कार्यकर्ते अल्ताफ मोहम्मद हुसेन यांचे बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा संध्या. ५ वाजता त्यांचे राहते मेफेअर, विरार गार्डन, खारोडी-बोळींज, विरार (पश्चिम) येथून काढण्यात आली. अल्ताफ हे समाजवादी विचारांचे निष्ठावान कार्यकर्ते होते. ते वसई तालुक्यात होणाऱ्या समाजवाद्यांच्या चळवळीत, धरणे, आंदोलन, मोर्चामध्ये सामील होणारे कार्यकर्ते होते. माजी आमदार, स्व. पंढरीनाथ (आप्पा) चौधरी, माजी आमदार, स्व. डॉमनिक घोनसालविस तसेच साथी स्व. विलासदादा विचारे यांच्या खांद्याला खांदा लावून लढणारे कार्यकर्ते होते. फेरीवाला संघाचे ते प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांनी फेरीवाल्यांच्या आंदोलनात पोलिसांच्या लाठ्या काठ्या खावून केसेस अंगावर घेऊन लढणारे योद्धे होते. लखनऊ, उत्तर प्रदेश येथे समाजवादी नेते तथा वीजतज्ञ स्व. प्रताप होगाडे, विलास सुरकर, शर्मा, जितेंद्र सत्पाळकर यांच्यासोबत समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्या समक्ष समाजवादी पार्टीमध्ये त्यांनी नुकताच प्रवेश घेतला होता.

### अनधिकृत होल्डिंग हाटविण्याची मागणी

लातूर : लातूर शहरात अनाधिकृतपणे लावण्यात आलेल्या होल्डिंग्स आणि युनिपोलच्या विरोधात लातूर जिल्हा छडणख ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहर महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी ही जाहिरातफलक उभारण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. एनएसयुआय पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, पालिकेचे नियम धाब्यावर बसवून शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होल्डिंग्स झळकत आहेत. या प्रकरणी महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न केल्याने शहरातील नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण पसरले आहे. संघटनेतर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन दुजाभाव न करता तातडीने अनधिकृत फलक हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई न केल्यास लातूर जिल्हा एनएसयुआय कडून महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. शहर स्वच्छता, नियोजन आणि कायदेपालनाच्या दृष्टीने या प्रकरणी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडूनही होत असून पुढील काही दिवसांत महानगरपालिकेची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष अक्षय चव्हाण, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### एसटी बस स्थानकाची स्वछता पाहणी

वसई : विरार शहरातील एसटी बस स्थानकाच्या स्वच्छतेची स्वच्छता समीतीचे सदस्य तसेच रायगड एसटी मंडळाचे अधिकारी चव्हाण, आगार व्यवस्थापक गोडे, वाहतूक निरिक्षक सिद्धेश्वर सूर्यवंशी, स्वच्छता पाहणी समितीचे सदस्य उमाकांत वाघ यांनी यावेळी पाहणी केली. पाहणीचा अहवाल यावेळी तयार करण्यात आला. स्थानकावर मोठ्या घडयाळ्याची आवश्यकता आहे. तसेच लांबपल्याच्या एसटी गाडयांविषयीची माहीती मोठया फलकांवर लावणे आवश्यक आहे. काही जाहिरात दारांनी एसटी विषयीची माहिती देणाऱ्या आपल्या जाहीरातींची फलके स्थानकावर लावली आहेत. तरी ही एकंदरीत या बस स्थानकांवर स्वछता बऱ्यापैकी आहे. विरार शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी हे बसस्थानक असल्याने हा रस्ता वाहतुकी व वर्दळीचा आहे. त्यामुळे बस स्थानकाच्या आवारात खाजगी वाहनांची बेकायदा पार्किंग होते. शहराबाहेरुन होणारी एसटी वाहतूक या बस स्थानका मार्गेच अर्नाळा एसटी आगारात जाते. मात्र या आगारातुन लांबपल्याच्या एसटी गाडयांची वाहतुक होते. शहरी एसटी वाहतूक होत नाही. वसई विरार पालिका देखील आपली परिवहन सेवेत प्रवाशांच्या आवश्यकतेनुसार सेवा देत नसल्याने सामान्य प्रवाशांना मात्र गैरसोय होते.

24 TO 30 NOVEMER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/22/2025 8:50 PM Page 1



पान १ वरून....

## अनेक वेळा समजावून हरीने ...

हरि रामचंद्र किलबिले हे मूळचे त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथील रहाणारे होते. दिंडोरी तालुक्यातील शिवनई गावातील मूर्तीकार सुधाकर लोंढे यांच्याकडे ते कामास आले होते. तेथे त्यांच्याच शेडमध्ये राहू लागले. त्यांचा एक नातेवाईक भारत वाघ रा. हरसुल हासुद्धा काम-धंद्याच्या निमित्ताने पत्नी व मुलांसह या गावात आला होता. आपला नातेवाईक या गावात आल्याचे समजल्यावर तो आता त्याच्याकडे जावू लागला, पण त्याचा उद्देश काही चांगला नव्हता. हरि हा भारतच्या पत्नीवर वाईट नजर ठेवून होता. वेळ मिळेल तेंव्हा तोभारत वाघ याच्या पत्नीची छेडछाड करून तिला त्रास देत होता. सतत तो तिला त्रास देत असल्याने आणि तो तिच्यावर वाईट नजर ठेवू लागल्याने भारतने त्याला अनेकदा समजावून सांगितले, मात्र हरि काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याचे उद्योग चालूच राहिल्याने त्या दोघांमध्ये अनेक वेळा वाद व हाणामारीसुद्धा झाल्या. हरि भारतचा नातेवाईक होता आणि तरीही तो भारतच्या बायकोची छेडछाड काढून तिच्यावर वाईट नजर ठेवून तो तिला त्रास देत होता. अखेर भारतच्या संयमाचा बांध सुटला. याचा आता काहीतरी बंदोबस्त करावा लागेल असे तो आता मनाशी म्हणू लागला होता. अनेकदा समजावून सांगूनही हरिच्या स्वभावात काहीच फरक पडत नव्हता. त्याचे उद्योग सुरूच राहिल्याने भारत आता त्याच्यावर खूप संतापला होता. आता याला धडा शिकवलाच पाहिजे, याचा काटा काढलाच पाहिजे असे त्याने एकदाचे ठरवून टाकले. दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिंडोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवनई गावाच्या शिवारातील शेत गट नं. ३६ अ मधील विहीरीत अज्ञात इसमाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत पाण्यावर तरंगत असल्याची खबर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी लोकांच्या मदतीने मृतदेह विहीरीच्या पाण्यातून बाहेर काढला, तेंव्हा मयत इसमास अज्ञात आरोपीने जीवे ठार मारून त्याचे हात-पाय लोखंडी तारेने बांधून व कमरेला साडीने मोठा दगड बांधून मृतदेह मिळून येवू नये म्हणून आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह विहीरीत टाकून देण्यात आल्याचे आढळून आले. याप्रकरणी राजेंद्र रामदास किलबिले याने दिलेल्या फिर्यादीनुसार दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४०७/२०२५ ला भारतीय न्यायसंहिता कलम १०३ (१) व २३८ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांनी सदर घटनेचा आढावा घेवून हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कळवण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर, दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी घटनास्थळ व मृतदेहची पहाणी केली.

मृतदेहाच्या अंगावर मिळून आलेले कपडे व वर्णन यावरून शिवनई गावाच्या परिसरात बातमीदारामार्फत मयत इसमाचा शोध घेतला असता मयताचे भाऊ व पुतण्या यांनी मयताची ओळख पटवली. मयत हरि रामचंद्र किलबिले (वय ६४) रा. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक हा असल्याचे निष्पन्न झाले. हरिबाबत पोलिसांनी माहिती मिळवली. तो काही दिवसांपासून दिंडोरी तालुक्यातील शिवनई परिसरात रहावयास आला होता. तो एका मूर्तीकाराकडे कामास लागला होता आणि त्याच्याच शेडमध्ये तो रहात होता. तो रहात असलेल्या ठिकाणी हरसुल येथील भारत काळू वाघ हा पत्नी व मुलांसह रहाण्यास आला होता. भारतच्या पत्नीवर वाईट नजर ठेवत तिची हरी छेडछाड करत असल्याने दोघांमध्ये अनेकदा वाद व भांडणे झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मग पोलिसांनी त्यावरून तपासाची चक्रे फिरवत संशयित भारत वाघ रा. हरसुल, ता. त्र्यंबकेश्वर याला ताब्यात घेतले. पोलिसांनी भारत यास विश्वासात घेवून त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मयत हरि रामचंद्र किलबिले हा आरोपी भारत काळू वाघ याच्या पत्नीवर वाईट नजर ठेवतो व तिची छेडछाड काढतो याचा राग मनात धरून भारतने हरिला गळा आवळून ठार मारले. त्याचे हात-पाय लोखंडी तारेने बांधून आणि कमरेला साडीने मोठा दगड बांधून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने हरिचा मृतदेह विहीरीत टाकून दिला अशी कबुली त्याने दिली, त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक केली. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपअधीक्षक किरणकुमार सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान राखुडे, उपनिरीक्षक सुदर्शन आवारी, अल्ताफ शेख, नवनाथ सानप, पोलीस अंमलदार विश्वनाथ काकड, श्रीकांत गारूंगे, प्रविण काकड, सुमित आवारी, बाळा पानसरे, प्रदीप शिंदे, हेमंत गिलबिले, प्रविण बहीरम, संतोष सोनवणे, दिलीप राऊत, मंगल सोनवणे, प्रकाश गायकवाड, राहुल जोपुळे व नितीन गांगुर्डे यांच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी बजावली.

## गुन्हेगारांशी अनैतिक संबंध ठेवून ...

गुन्हेगारी प्रवृत्तीच्या रवी याच्याशी तिचे अनैतिक संबंध जुळले. मात्र असे संबंध फार काळ टिकत नाहीत. रवी आजकाल सुवर्णाला पैसे देत नव्हता. त्यामुळे ती चिडलेली होती, त्यातून दोघांची भांडणे सुरु होती. या भांडणामुळे तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला आणि एके दिवशी दोघांमध्ये झालेल्या भांडणात रवीने सुवर्णाचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

सुवर्णा राह ही महिला गेल्या चार पाच वर्षापूर्वी कामाच्या निमित्याने पुण्यातील येरवडा भागात राहयला आली.तिला तिच्या नवऱ्याने सोडून दिल्याने तशी ती एकटीच राहत होती. मिळेल ते मुजरीचे काम करून ती आपला उदरनिर्वाह करीत असताना तिची ओळख रवी साबळे याच्याशी झाली.रवी साबळे हा विवाहित होता. त्याला दोन मुले ही आहेत. मागील काही वर्षापूर्वी त्याने पत्नीचा खुन केला होता. त्या गुन्हयात त्याला सध्या कोर्टाकडून जामीन मिळाल्याने तो ही एकटाच राहत होता. तो सराईत गुन्हेगार असल्याने पुणे आणि परिसरातील पोलीस स्टेशनमध्ये त्याच्यावर खुनासह तब्बल २० असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचे वडिल रमेश साबळे हे रिक्षा चालवित असतात. ते ही मुलगा रवी पासून वेगळे राहत आहेत. रवी आणि सुवर्णा याची ओळख झाल्याननंतर ते दोघे एकमेकांची गरज ओळखून प्रेमात पडले. प्रेमात पडल्यानंतर रवी याने सुवर्णा हिला ठेवून घेतले. येरवडा परिसरातील यशवंतनगर भागात त्याने सुवर्णाला भाडयाच्या घरात ठेवले. त्या दोघात लिव्ह इन रिलेशीनशीपचे नाते संबंध तयार झाल्याने रवी हा सुवर्णाकडे कायम येत जात होता. त्यातून त्याच्यात लवकरच शारीरिक संबंध निर्माण झाले. सुवर्णाला त्याने ठेवून घेतल्याने ती त्याला आपला नवरा मानत होती. परंतु रवी हा सराईत गुन्हेगार आहे. त्याने तिच्या पत्नीचा खुन केला आहे हे तिला माहित नव्हते. ते दोघे ही लिव्ह इन मध्ये राहत असल्याने शेजाऱ्यांना ते दोघे पती पत्नीच आहेत असे वाटत होते. परंतु हल्ली त्या दोघात नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून रोज भांडण तंटा होऊ लागला होता. त्या भांडणात रवी दारू पिऊन येवून सुवर्णाला मारहाण करीत शिव्या देत होता. भांडणात ती ही त्याला जशास तसे उत्तर देत होती. तु मला मारहाण करायला मी काय तुझी लग्नाची बायको नाही असे ती त्याला ठणकावून सांगत होती.

तुझ्यासारखे माझ्याकडे किती तरी तरूण येतात तुझी काय बिशाद आहे असे ती त्याला म्हणत होती. याचा अर्थ सुवर्णाने आपल्याला सोडून दुसरा घरोबा केला आहे असा त्याने लावला. हल्ली तो दारूच्या नशेत येवून तुझा यार कोण आहे? मला माहित आहे. तु त्याच्यासोबत मजा मारतेस आणि पैसे मात्र माझ्याकडे मागतेस म्हणून तो तिला जबर मारहाण करीत तिच्यावर संशय घेत होता. त्यामुळे ती ही त्याच्यावर चिडत होती. तिने त्याला स्पष्ट शब्दात सांगितले होते की, तु माझ्याकडे येवू ही नकोस आणि मला पैसे ही देवू नकोस. सुवर्णा आपल्याला का टाळत आहे हे त्याने ओळखले होते.ती परप्रातीय आहे तिने तिच्याच नात्यातील सोयरा बघितला आहे हे त्याला ही हल्ली कळून चुकले होते.हल्ली ती रवीचा फोन ही स्विकारत नव्हती. त्यामुळे तो तिच्यावर जास्तच चिडत होता. यातून त्या दोघांची भांडणे वाढलेली होती. भांडणात तो तिला सांगत होता तु माझ्याशी नीट वागली नाहीस तर मी तुझा खून करेन मी आधीच माझ्या बायकोचा खुन केला आहे. मला तुझा दुसरा खुन करायला भिती वाटणार नाही. तरी ही सुवर्णा ही त्याला भीक घालत नव्हती. तुला काय करायचे ते कर असे सांगून ती त्याला कायमचे टाळण्याचा प्रयत्न करीत होती. 'लिव्ह इन' मध्ये ते दोघे राहत असताना ही दोघात संशयाचे नाते निर्माण झाले होते. ती त्याचे काही एक ऐकत नव्हती.तिला हल्ली रवीचे सगळे कारनामे समजले असल्याने ती त्याच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करीत त्याच्याशी असणारे संबंध तोडण्याचा प्रयत्न करीत होती. ती आपल्याला टाळत आहे हे त्याच्या लक्षात आल्यवर त्याने तिला मी तुझ्यासाठी खर्च केलेले पैसे परत दे म्हणून त्याने तिच्या मागे तगादा लावला. त्यावेळी तिने ही त्याला तुझ्याबरोबर मी फुकट झोपायला मी काय तुझी बायको नाही. त्यामुळे तु माझ्याकडे पैसे परत मागू नकोस असे सांगून त्याला बाहेरचा रस्ता दाखविला.ती आपल्याशी नीट वागत नाही. आपल्याबरोबर झोपत नाही त्यामुळे तिचा कायमचा काटा काढयाचा असा विचार त्याने केला. तिला कायमचे संपविले तर बरे होईल असे त्याला वाटत होते. त्यामुळे त्याने तसा विचार करून तिची कायमची गेम करण्याचा विचार केला. शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ ला तो नेहमीप्रमाणे दारुच्या नशेत ती राहत असलेल्या यशंवतनगर भागातील रात्रीच्या वेळी घरात गेला. आज त्याला तिच्याबरोबर मनसोक्त मजा मारण्याची इच्छा होती. तो दारूच्या नशेत घरात आल्यावर तिने त्याला आपल्या अंगाला हात लावू दिला नाही. तु माझ्याकडे कशाला आला आहेस मी तुझी कोण आहे असे म्हणत तिने त्याच्याबरोबर भांडण काढयला सुरूवात केली. तू माझ्याकडून पैसे घेणार आणि दुसऱ्याला मजा मारायला देणार म्हणत त्याने तिला मारहाण करायला सुरूवात केली. त्याने दरवाजा बंद केला असल्याने दोघांच्या भांडणाचा आवाज बाहेर जात नव्हता. तो आधीच दारूच्या नशेत असल्याने तो तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देत होता. त्याच्या रागाचा पारा चढला होता.त्या रागाच्या भरात त्याने जवळच पडलेला लाकडी दांडका उचलला आणि त्या लाकडी दांडकीक्याने तिला जबर मारहाण केली.ती ओरडत खाली पडली.तसे त्याने शेजारीच पडलेली वीट घेतली आणि ती सुवर्णा हिच्या डोक्यात जोरात हाणली. त्यासरशी तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला.त्यात तिचा जागीच मृत्यु झाला. तिचा खुन केल्यानंतर तो भानावर आला. तिला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली बघून तो डोक्याला हात लावून तेथेच बसला. काही वेळ विचार करून त्याने तिचा मृतदेह घरातील बेडखाली लपवून ठेवला आणि जणु काही झालेच नाही अशा अविर्भावात तो कोणाला काही समजणार नाही अशा पध्दतीने घराला बाहेरून कुलूप लावून गेला. त्यानंतर तो दुसऱ्या तिसऱ्या दिवशी घरात परत आला असल्याने शेजाऱ्यांना काही शंका आली नाही. नंतर मात्र मृतदेह कुजत चालल्याने दुर्गंधी सुटल्याने शेजाऱ्याना ही शंका आली तशी शेजाऱ्यात कुजबुज सुरू झाल्यावर तो सर्तक झाला. आता मृतदेहाची विल्हेवाट लावली पाहिजे असा त्याने विचार केला. त्याने ही गोष्ट आपले वडिल रमेश साबळे यांना सांगितली आणि प्रियेसी सुवर्णा हिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावूया असे त्याना सांगितले. त्यांनी ही घटनास्थळी येवून बघितले. मृतदेह कुजत चालला आहे यातून मार्ग काढयाचा म्हणून ते ही मुलगा रवी याला मदत करायला तयार झाले. ते रिक्षा चालवित असल्याने तिचा मृतदेह रात्रीच्या वेळी बाहेर काढून रिक्षातून घेऊन जायचे आणि दुरवर कुठेतरी नेवून फेकायचे असा त्यांनी प्लॅन केला. मंगळवार दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी रवी याचे वडिल रमेश साबळे हे रात्रीच्या वेळी रिक्षा घेऊन यशवंतनगर येथे आले. दोघांनी मिळून रात्रीच्या अंधारात तिचा मृतदेह रिक्षात टाकला. त्या रिक्षाने ते धानोरा, विमानतळ परिसरातील लोहगाव येथील कचरा डंपिगमध्ये आले. तेथे अगोदरच कचरा पेटलेला होता. त्या पेटत्या कचऱ्यात त्यांनी तिचा मृतदेह टाकला.

कचऱ्याच्या आगीत सुवर्णा हिचा मृतदेह अधर्वट जळाला. दुसऱ्या दिवशी सकाळी कचऱ्याची विल्हेवाट लावायला येणाऱ्या लोकांना एका महिलेचा अधर्वट जळालेला अवस्थेत मृतदेह दिसून आला. त्यांनी या घटनेची माहिती लोहगाव पोलीसांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच तातडीने पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा सुरू केला. मृतदेह कुजत चालल्याने त्याची ओळख ही पटविणे पोलीसांना कठीण झाले होते. पंचनामा करून पोलीसांनी तो मृतदेह शवविच्छेदनासाठी ससुन रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार सह आयुक्त रंजनकुमार शर्मा अप्पर पोलीस अयुक्त मनोज पाटील आणि पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी भेट देवून घटनेची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्या महिलेचा मृतदेह कुजला असल्याने याचा अर्थ त्या महिलेला दोन तीन दिवस मारून नंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी लोहगाव परिसरातील कचरा डंपीगमध्ये आणून टाकल्याचे पोलीसांनी ओळखले. मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पोलीसांनी सोशल मिडियावर तिच्या मृतदेहाचे फोटो टाकला. परंतु त्याचा ही काही उपयोग झाला नाही.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी पसिरातील सीसीटीव्हीचे फुटेज तपासले असता त्यांना मंगळवार रात्री एक बंद लाईट असलेली रिक्षा त्या परिसरात येत जात असल्याचे दिसून येत होते. पोलीसांनी त्या रिक्षाचा शोध घेतला असता ती रिक्षा रमेश साबळे याची असल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आले. त्यांनी रमेश साबळे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची आणि मृत महिलेची माहिती काढली असता त्यांनी मयत महिला ही सुवर्णा राह असून ती आपला मुलगा रवी साबळे याच्याबरोबर यशवंतनगर भागात लिव्ह इनमध्ये राहत असल्याचे पोलीसांना सांगितले.

मुलगा रवी साबळे याने तिचा खुन केला असून मृतदेहाची विल्हेवाट आम्ही दोघांनी मिळून लावल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी रवी साबळे याला एलसीबीच्या पोलीसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी या गुन्हयाची चौकशी केली असता त्याने मयत सुवर्णा आणि आपण लिव्ह इन मध्ये राहत होतो त्यात आमची भांडणे सुरू झाल्याने तसेच ती हल्ली मला जवळ करीत नसल्याने मला तिच्यावर संशय येवू लागल्याने १४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या भांडणात मी तिच्या डोक्यात लाकडी दांडका आणि वीट घातली. त्यात तिचा मृत्यु झाल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर या घटनेत पोलीसांनी स्वतः फिर्यादी होऊन या घटनेची फिर्याद नोंदवली. ही घटना यशवंतनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली असल्याने येरवडा पोलीसात हा गुन्हा वर्ग करण्यात आला. सुवर्णा राह (वय २८) हिचा खुन करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पोलीसांनी रवी साबळे (वय ३०) आणि त्याचे वडिल रमेश साबळे (वय ६४) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. येरवडा पोलिसांनी या गुन्हयाचा तपास करून रवी साबळे आणि रमेश साबळे यांना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने या दोघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी रवी साबळे याच्याकडून गुन्हयात वापरलेली लाकडी दांडका आणि वीट जप्त केली तर रमेश साबळे याच्याकडून गुन्हयात वापरलेली रिक्षा जप्त केली.या घटनेचा तपास पो.निरी गोविंद जाधव,आणि पो.निरी (गुन्हे) शरद शेळके याच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी नितीन राठोड याच्या पथकाने केला.

पान ८ वरून....

## भाजपाच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी...

असा प्रश्न उपस्थित करून सर्व काही असताना विकासाच्या कोणत्याही योजना देऊ शकले नाहीत देशमुखांकडे दानतच नाही असे सांगून सर्व जाती-धर्माच्या घटकांना न्याय देण्याचे काम रमेशआप्पांनी केले. रेणापूरच्या विविध विकासासाठी अनेक योजना मंजूर केल्या. रेणापूरच्या विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेव्हा प्रत्येक कार्यकर्त्यांनी घराघरापर्यंत जाऊन मतदारांना विकासाचा विश्र्वास द्यावा. कार्यकर्त्याना पदावर बसविण्यासाठी आम्ही पूर्ण ताकतीने पाठीशी उभे आहोत असे बोलून दाखवले. रेणापूर नगरपंचायतीचा पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान भाजपाला मतदारांनी दिला असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून रेणापूरच्या सर्वांगीण विकासासाठी ७० ते ८० कोटी रुपयाचा निधी आणून अनेक विकास कामे केली मात्र काँग्रेसच्या आमदारांनी पंधरा वर्षात ५० लाखाचाही निधी दिला नाही. जनता विकासाच्या पाठीशी आहे निश्चितपणे भाजपाला आशीर्वाद देणार यात शंका नाही तेव्हा विकास कामाच्या आधारावर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून प्रत्येकांनी कमळ चिन्ह प्रचंड बहुमताने विजयी व्हावे यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. रमेशआप्पा दिलदार नेते आहेत मागेल त्याला विकासाची कामे मंजूर करून दिली निधी मिळवून दिला. मतदार संघाचा कायापालट करीत आहेत केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे रेणापूर येथेही भाजपाची सत्ता आली तरच विकास होऊ शकतो हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असून नगरपंचायतीवर शंभर टक्के भाजपचा विजय झाला पाहिजे या ध्येयाने सर्वांनी काम करावे असे आ. अभिमन्यू पवार यांनी बोलून दाखविले. प्रारंभी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून रेणापूर शहरात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली तर दशरथ सरवदे यांनी भाजपाच्या सर्व उमेदवारांचा परिचय करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दत्ता सरवदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या बैठकीस भाजपाचे उमेदवार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसई तहसीलदार कार्यालयात...

यंत्रावर योग्यरीत्या मतदान होते का? याची चाचणी केली जाणार आहे. या प्रक्रिये करता वसई तालुक्यातील विविध तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल कर्मचारी सहभागी झाले होते. येत्या काही दिवसात याबाबत निवडणूक प्रक्रियेसाठी शासन स्तरावर जलदगती कारवाया होणार आहेत. यात मतदान केंद्रांची पाहणी, साधन सामग्री, कर्मचारी बळ इत्यादी तजवीज करण्यात येणार आहे.

## आएमएच्या राज्य उपाध्यक्षपदी ...

बरमदे यांची निवड करण्यात आली आहे. MASTACON 2025 या राज्यस्तरीय अधिवेशनात ही घोषणा होताच उपस्थित मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. राज्यातील डॉक्टरांच्या हक्क, सुरक्षाभान आणि व्यावसायिक प्रगतिसाठी ते सक्रियपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. कल्याण बरमदे यांनी सर्व डॉक्टरांचे एकत्र येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एकजुटीने कार्य केल्यास डॉक्टरांशी संबंधित सर्व समस्या प्रभावीपणे हाताळता येतात. आयएमए ही सर्वांची मातृसंस्था असून, ही मानाची जबाबदारी बिनविरोध मिळाल्याचा आपल्याला अभिमान आहे. सर्व सहकारी डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यास आपण प्राधान्य देणार आहोत. आयएमएच्या वतीने प्रतिवर्षी सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करते. तसेच या वर्षात पौगंडावस्थेतील समस्या सोडविण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शक शिबीर, एचपीव्ही वॅक्सीन (गर्भमुख कँसर प्रतिबंधक लस) कॅम्पस व स्त्रियांसाठी पीएपी स्मेअर म्हणजे गर्भमुख कँसरचा शोध घेणारी चाचणी घेण्याचे प्रयोजन असल्याचेही त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल डॉ कल्याण बरमदे यांचे वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे.

## निलंगा नगर परिषदेची निवडणूक लातूर...

विकासचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही निवडणूक जिंकायचीच या जिद्दीने सर्व काँग्रेसजण कामाला लागले आहेत. त्यामुळे यावेळी निलंगा नगर परिषदेवर काँग्रेस पक्षाचाच झेंडा फडकेल, असा विश्वास माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला. निलंगा नगरपरिषदेसाठी काँग्रेस पक्षाने प्रमाणिक, होतकरू, कर्तुत्वान, लोकाभिमुख उमेदवारांची निवड केली आहे, हे करताना सोशल इंजिनिअरिंग उत्तम पद्धतीने जपण्याचा प्रयत्न झाला आहे, काँग्रेस पक्षाची ही सर्वात जमेची बाजू आहे. निलंग्यात येऊन सर्व काँग्रेस पदाधिकारी आणि पक्षाच्या उमेदवारासमवेत चर्चा केली, तेंव्हा सर्वांच्या चेहऱ्यावर जिंकण्याचा आत्मविश्र्वास दिसून आला. या निवडणुकीची काँग्रेस पक्षाकडून सुरुवातच जोरदार झाली असल्यामुळे शेवटी ही विजयाने होणार याची खात्री असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष पद आणि नगरसेवकांसाठी इच्छुक उमेदवारांची संख्या अधिक होती, त्यामुळे सर्व समाज घटकांना न्याय देत लोकाभिमुख उमेदवार निवडीचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले होते. त्यात पक्ष पातळीवरून कोणताही हस्तक्षेप करण्यात आला नाही. उमेदवार निवडीत काँग्रेस पक्षाने घेतलेली आघाडी लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षातील मंडळीच्या मनात धडकी भरली आहे. त्यामुळेच या निवडणुकीला निलंगा विरुद्ध लातूर किंवा देशमुख विरुद्ध निलंगेकर असा रंग देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सुरू झाल्याचे दिसते आहे. अफवा तंत्राचा वापर करून जनतेची दिशाभूल करण्याचे प्रयत्न भाजपाच्या लोकांकडून नेहमीच होतात. हे आता जनतेनेही ओळखले आहे. त्यामुळे भाजपाच्या भूलथापा, अफवा तंत्राला जनता थारा देणार नाही असा विश्र्वासही आमदार देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला. निलंगा शहराचा जो काही विकास झाला आहे तो यापूर्वी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाच्या कार्यकाळातच झालेला आहे. त्यात भाजपच्या सत्ताधारी मंडळींनी कोणतीही भर घातलेली नाही. त्यामुळे वाढत्या निलंगा शहरात आज नागरिकांना पाणी, रस्ते, वीज, या मूलभूत सुविधाही मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे, ही परिस्थिती बदलून निलंगा शहराला पुन्हा विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी काँग्रेस पक्ष वचनबद्ध आहे, माजी मुख्यमंत्री आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर, माजी केंद्रीय गृहमंत्री आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर आणि माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या कार्यकाळातील सुसंस्कृत आणि विकासाचे राजकारण निलंग्यातील जनतेला आज हवे आहे. शहर काँग्रेसचे अध्यक्ष अजित नाईकवाडे, काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार हमीद शेख आणि नगरसेवक पदाचे काँग्रेस उमेदवारांना जनतेने आशीर्वाद देऊन विजय केल्यास ते सर्वजण मिळून निलंगा शहराला विकसित शहर म्हणून नवी ओळख निर्माण करतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिले. दरम्यान लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूकीत निलंगा शहरातून काँग्रेस पक्षाला चांगले मताधिक्य आहे यावरुन हे शहर सर्वधर्म समभाव मानणाऱ्या काँग्रेस विचारधारेला मानणारे आहे हे स्पष्ट दिसून येते त्यामुळे या नगरपरीषद निवडणूकीतही काँग्रेस पक्षाला यश मिळेल असा विश्वास खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. काँग्रेस पक्षाने नगरपरीषद निवडणूकीत उमेदवारी देतांना सर्व समाज घटकांना योग्य पध्दतीने प्रतिनीधीत्व देण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे सर्वच समाजघटकाकडून काँग्रेस पक्षाला पाठींबा मिळत असून या जोरावर निलंगा नगर परीषदेवर काँग्रेस पक्षाचा झेडा फडकणार असल्याचे डॉ. शिवाजी काळगे यांनी म्हटले.

## वसईतील भूमिपुत्र संघटीत होणे...

तरुणींनी जास्तीत जास्त संख्येने सामील व्हावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. फादर मायकलजी यांनी आपल्या आशिर्वादपर भाषणात सांगितले की, सर्वांनी इच्छाशक्ती प्रखर केली तर संघटना नक्कीच वाढीस लागेल. तसेच वसईतील सर्व छोट्या-मोठ्या सामाजिक संस्थांना आपल्या सोबत घेण्याचे आव्हान त्यांनी केले. मलिंद खानोलकर यांनी सांगितले की, पक्षीय राजकारण व हेवेदावे बाजूला ठेवून आपण मनपाची निवडणूक जिंकून आपला प्रतिनिधी मनपात पाठवावा आणि चांगले कार्य करावे. सभेत उपस्थित भूमिपुत्रांनी आपापल्या भागातील विविध समस्या मांडल्या. मॅक्सवेल रोज यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

## 'समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत ...

गायगोठ्याचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी स्थानिक सरपंच ग्रामपंचायत अधिकारी तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## वसईत श्री मुत्तप्पण वेल्लाटम...

मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे, तसेच अधिक माहितीसाठी मो. नं. ९३२३५२८१९७ यावर संपर्क साधन्याचे आवाहन केले आहे.

## क्षितिज ठाकूर यांनी सत्ताधारी पक्षावर...

ऐकून घेण्यात आल्या आणि त्या संदर्भात अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्या सोडवण्यावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमात बोलताना माजी आमदार क्षितिज ठाकूर यांनी सत्ताधारी आमदारांवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, सत्ताधारी पक्षाने त्यांच्या ३५ वर्षांच्या कामाची जबाबदारी घेण्यासाठी एका व्यासपीठावर एकत्र यावे. मी सर्व हिशेब देण्यास तयार आहे. दोन्ही आमदारांचे कुटुंब बांधकाम व्यवसायात आहेत आणि आमच्या पक्षाने त्यांच्या इमारतींना पाणी देण्याचा प्रयत्नही केला. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये, माझ्या वाढदिवशी, महायुती सरकारचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वसई-विरार प्रदेशात हजारो कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांना मंजुरी दिली. यामध्ये अचोल रुग्णालयासाठी २५० कोटी रुपये समाविष्ट होते, परंतु सत्ताधारी आमदार आजपर्यंत फक्त कागदोपत्रीच काम करत आहेत. बांधकाम सुरूही झालेले नाही, तरीही श्रेय घेण्याचा आणि जनतेची दिशाभूल करण्याचा खेळ सुरूच आहे. कार्यक्रमात शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने हे सिद्ध केले की बहुजन विकास आघाडीचा या प्रदेशात मजबूत पाया आहे. नेत्यांनी कार्यकर्त्यांना संघटना आणखी मजबूत करण्याचे आवाहन केले. ही परिषद बीव्हीएसाठी एक टर्निंग पॉइंट ठरू शकते. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नेतृत्वाची आक्रमक भूमिका यावरून असे सूचित होते की नालासोपारा-वसई प्रदेशातील निवडणूक समीकरणे बदलू शकतात. पक्ष आता पूर्णपणे सक्रिय आहे. तळागाळातील पातळीवर, आणि सार्वजनिक पाठिंब्यावर सक्रियपणे काम करत आहे. अभिप्राय हा अंतिम निर्णय असेल.

क्राईम संध्या सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. ३० नोव्हेंबर २०२५ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ७

# ‘लाडकी बहीण योजने’चा गैरफायदा घेणाऱ्या सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार; पैसेही वसूल केले जाणार!



**मुंबई : वार्ताहर**

लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई होणार असल्याची माहिती समोर आली आहे. ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचा फायदा घेतला आहे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. सोबतच घेतलेले पैसे वसूल केले जाणार आहे, मात्र वेतनवाढ ही रोखली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अडीच कोटी लाडक्या बहिणींची केवायसी सुरू केल्यानंतर अनेक बाबी समोर आल्या आहेत. पाच हजार सरकारी कर्मचारी तर तीन हजार शिक्षकांसह पोलीस आणि इतर विभागातील कर्मचाऱ्यांनी योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे. ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांना महिला बाल विकास विभागाकडून पत्र पाठवून कारवाई केली जाणार आहे. अडीच कोटी महिलांपैकी एक कोटी तीस लाख महिलांची आतापर्यंत ई केवायसी पूर्ण झाली आहे. लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांची छाननी केली जात आहे. पुढील महिनाभरात हे कर्मचारी कोणकोणत्या विभागातील आहेत हे स्पष्ट होईल, त्यानंतर त्या त्या विभागांना यासंदर्भातील पत्र पाठवण्यात येणार आहे. अशा कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. त्यांच्याकडून पैसे तर वसूल केले जाणारच आहेत, शिवाय त्यांची पगारवाढही रोखली जाण्यासंदर्भात कारवाई केली जाणार आहे. याविषयीचे पत्र महिला व बालविकास विभागाकडून संबंधित कर्मचाऱ्यांना दिले जाणार आहे.

अधिक उत्पन्न असतानाही योजनेचा लाभ. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा अडीच लाख असली तरी अधिक उत्पन्न असलेल्या नागरिकांनीही निवडणूक काळातील गडबडीचा लाभ घेत या योजनेचे रक्कम लाटल्याचा प्रकार समोर आला आहे. अशा सुमारे पाच लाख महिला लाभार्थींनी कुटुंबांची उत्पन्न मर्यादा अधिक असूनही लाडकी बहीणचे पैसे लाटले आहेत. त्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. आत्तापर्यंत राज्यातील लाडकी बहीण योजनेसाठी पात्र असलेल्या अडीच कोटी महिलांपैकी आतापर्यंत १ कोटी ३० लाख महिलांचे ईकेवायसी पूर्ण झाले आहे. अद्यापही १ कोटीवर महिलांचे ईकेवायसी पूर्ण झालेले नाही. त्यांच्यासाठी ३१ डिसेंबरची मुदतवाढ देण्यात आली आहे. एवढ्या वेळेत ईकेवायसी पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र त्याही वेळेत ईकेवायसी पूर्ण न झाल्यास पुढील निर्णय घेतला जाईल. त्याचप्रमाणे ज्या महिलांचे पती किंवा वडील दोघेही हयात नाहीत, त्यांनी त्यांचे मृत्यूपत्र अंगणवाडी सेविका कार्यालयात दिल्यास त्यांनाही आपले ईकेवायसी पूर्ण करून या योजनेचा लाभ घेता येणार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या महिलांचे ई केवायसी अद्याप झालेलं नाही त्यांच्यासाठी आता महत्त्वाची बातमी आहे. या योजनेच्या ई केवायसी प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. या आधी १८ नोव्हेंबर पर्यंत ई केवायसी करणं बंधनकारक करण्यात आलं होतं. आता त्यासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी त्यांच्या सोशल मीडियावरुन या निर्णयाची माहिती दिली आहे. राज्यातील काही भागात पूराची स्थिती निर्माण झाल्यामुळे, तसेच इतर अडचणींमुळे अनेक लाभार्थी महिलांना ई केवायसी करता आलं नव्हतं. अशा महिलांसाठी आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

# भिवंडी वाडा महामार्गावर धुळच धुळ



**वाडा:वार्ताहर**

भिवंडी-वाडा या महत्त्वाच्या महामार्गाचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम मागील अनेक महिन्यांपासून सुरू असले तरी हे काम अत्यंत संथ गतीने चालू असल्याने नागरिकांचे हाल वाढले आहेत. कामाच्या अनियमित नियोजनामुळे अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवला असून काही भागात फक्त माती व खडी टाकून काम अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण मार्गावर प्रचंड धुळीतून प्रवास करावा लागत असून या रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना, विशेषत: दुचाकीस्वारांना अक्षरशः त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दुचाकीस्वारांनी सांगितले की, वाहन चालवताना समोरचा रस्ता दिसणे कठीण होत आहे. धुळीमुळे डोळ्यात जळजळ, श्वास घेण्यास त्रास, सतत चेहरा व कपडे धुळीने माखणे ही समस्या कायम झाली आहे. धुळीचे ढग इतके दाट उडत आहेत की, रस्त्यावर अपघात घडण्याची शक्यता वाढली आहे. काही ठिकाणी खडीचे थर सैल असल्याने दुचाकी घसरून पडण्याचे प्रकारही घडत आहेत. स्थानिक व्यापारी व नागरिकांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काम सुरू आहे हे ठीक आहे, पण काम पूर्ण न होईपर्यंत तरी रोज रस्त्यावर पाणी मारण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने केली जात आहे. अनेकांनी संबंधित ठेकेदार व विभागाकडे याबाबत तक्रारीही नोंदवल्या आहेत. शासनाच्या खर्चातून होत असलेल्या या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामात नियोजनशून्यता दिसत असल्याने नागरिकांनी कामाला वेग देणे, धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी दररोज पाणी मारणे, तसेच खोदलेले रस्ते तात्पुरते समतल ठेवणे यांसारखी तात्काळ पावले उचलण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने योग्य ती तातडीची उपाययोजना न केल्यास येत्या काळात या मार्गावरील वाहतूक आणि नागरिकांचे आरोग्य दोन्ही धोक्यात येऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## प्रभाग १५ मधून प्रगती वलटे यांची उमेदवारी निश्चित



**वाडा : वार्ताहर**

वाडा नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १५ येथून प्रगती महेंद्र वलटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपले योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा, महिलांचे सक्षमीकरण, युवकांसाठी संधी निर्माण करणे या प्राधान्याच्या मुद्यांवर काम करण्याची ग्वाही दिली. यावेळी प्रगती वलटे यांनी नागरिकांना आवाहन करत म्हटले की, आपल्या प्रभागाचा विकास हा माझा ध्यास आहे. आपण सर्वांनी एकदिलाने साथ दिल्यास प्रभाग क्रमांक १५ आदर्श प्रभाग म्हणून उभा राहील.

# वसईत महिलेसह मुलाला ओलीस ठेवून दिवसाढवळ्या दरोडा

**वसई : वार्ताहर**



पुन्हा एकदा वालिव पोलिस ठाण्याच्या परिसरात कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, तीन अज्ञात गुन्हेगारांनी रिलायबल ग्लोरी टॉवरवर दिवसाढवळ्या दरोडा टाकला. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे, पोलिसांच्या गस्त आणि सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसई पूर्वेकडील सातीवली येथील रिलायबल ग्लोरी टॉवरमधील फ्लॅट क्रमांक ३०१ मध्ये राहणाऱ्या कविता राऊत दुपारी १ ते १:३० च्या दरम्यान तिच्या धाकट्या मुलासह घरी होत्या. तीन अज्ञात संशयितांनी दाराची बेल वाजवली आणि जबरदस्तीने घरात घुसले. आत प्रवेश करताना, गुन्हेगारांनी कविता राऊतच्या गळ्यावर चाकूने धाडस केले आणि तिच्या धाकट्या मुलाचे हात टेपने बांधले. गुन्हा केल्यानंतर, आरोपी घरातील दागिने, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू घेऊन पळून गेले. गुन्हेगार निघून जाताच, पीडितेने आरडाओरडा केला आणि आजूबाजूच्या लोकांना सावध केले. माहिती मिळताच वालीव पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तपास सुरू केला. आरोपींची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांना अटक करण्यासाठी पोलिस आता टॉवरमधील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. सुरक्षित मानल्या जाणाऱ्या निवासी संकुलात दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बहुमजली इमारतींमध्येही अशा घटना घडू लागल्या तर सुरक्षेची जबाबदारी कोणाची असेल असा प्रश्न लोक विचारत आहेत. पोलिसांनी या प्रकरणात जलद कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे, परंतु सध्या परिसरात तणाव आणि चिंता आहे.

## ट्रकच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू; ट्रक चालकाची इतर तीन दुचाकींनाही धडक

**ठाणे : वार्ताहर**

सरळगाव येथे एका ट्रकच्या धडकेत पादचारी मोहन नाकुडा (२०) यांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी रात्री उघडकीस आली. याप्रकरणी किन्हवली पोलीस ठाण्यात ट्रक चालक रईस शहा (४५) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. अपघातानंतर रईस याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या तीन दुचाकींनाही धडक दिली. येथील नामपाडा भागात मोहन हे वास्तव्यास होते. ते सरळगाव मार्गावरून पायी जात असताना भरधाव ट्रकने त्यांना धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर ट्रक चालक रईस याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक रस्त्याकडेला उभ्या केलेल्या इतर तीन दुचाकींना धडकला. दुचाकींवर चालक नसल्याने यात कोणीही जखमी झाले नाही. या अपघाताची माहिती किन्हवली पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी रईस याला ताब्यात घेतले. त्याच्याविरोधात किन्हवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती किन्हवली पोलिसांनी दिली.

## पतीकडून पत्नीच्या हत्या प्रकरणी पोलिसांनी ठोकल्या आरोपीला बेड्या!



**डहाणू : वार्ताहर**

मुंबई-अहमदाबाद महामार्गाजवळ एका अनोळखी महिलेचा खून झाल्याच्या घटनेने तलासरी परिसरात खळबळ उडाली होती. पालघर पोलिसांनी या गुन्ह्याची तत्परतेने दखल घेत या गुन्ह्याचा छडा लावत आरोपीला अटक केली आहे. दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई-वडोदरा एक्सप्रेस हायवे रोडच्या पुलाजवळ अंदाजे ३० ते ३५ वर्षीय अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला होता. गळ्याला ओढणीने आवळून तिचा खून करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले होते. याबाबत तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पालघरचे पोलीस अधीक्षक यांनी तातडीने तलासरी पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पथके तयार केली. या पथकांनी कोणतीही माहिती उपलब्ध नसताना, मयत महिलेचे फोटो विविध प्रसारमाध्यमांत प्रकाशित केले. तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत त्यांनी सर्वप्रथम महिलेची ओळख पटवली. ती अफसाना खान (वय २५, रा. सुरत) असल्याची खात्री झाली. मयत महिलेची ओळख पटल्यानंतर पोलिसांनी तिच्याबद्दल अधिक तपास केला. या तपासामध्ये, पोलिसांनी तिचा पती साकीरअली मन्सुरी (वय ४३, चालक, रा. सुरत) याला गुजरात-महाराष्ट्र सीमेवर असलेल्या आच्छाड बॉर्डर येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने अनैतिक शारीरिक संबंधाच्या कारणावरून हा खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी साकीरअली मन्सुरी याला अटक केली असून, तलासरी पोलीस पुढील तपास करत आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी ही कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## दिलीप पाटील यांचा वाडा तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा

**वाडा : वार्ताहर**



वाडा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीप मुकुंद पाटील यांनी पक्षातील अंतर्गत गैरव्यवस्था आणि प्रोटोकॉल भंगाचा उल्लेख करत आपल्या पदाचा स्वेच्छेने राजीनामा जाहीर केला आहे. त्यांनी २२ नोव्हेंबर २०२५ रोजी हा राजीनामा पक्ष नेतृत्वाकडे सादर केला. गेल्या अनेक वर्षांपासून तालुका काँग्रेस अध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळत असलेले पाटील हे मागील पंचवीस वर्षांपासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. संघटन बांधणी, जनसंपर्क आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम करत पक्षविस्तारात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. मात्र, अलीकडच्या काळात तालुका स्तरावर पक्ष नेतृत्वाकडून होणारी दखल न घेणे, तसेच वाडा नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एबी फॉर्म वितरणातील प्रोटोकॉल भंग, मध्यस्थ व दलाल प्रवृत्तीची वाढ या कारणांमुळे पक्षाच्या शिस्तीला तडा जात असल्याची खंत पाटील यांनी व्यक्त केली. जिल्हा अध्यक्षांकडून तालुका अध्यक्षाकडे प्रोटोकॉलप्रमाणे एबी फॉर्म सुपूर्त व्हावेत, अशी अपेक्षा असताना तसे न घडणे अत्यंत गंभीर आहे,’ असे त्यांनी नमूद केले. संघटनामध्ये निर्माण झालेल्या या अनाकलनीय व निराशाजनक परिस्थितीमुळे मानसिक खिन्नता वाढल्याने पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. दरम्यान, त्यांच्या राजीनाम्यामुळे तालुक्यातील काँग्रेस पक्षात खळबळ उडाली असून पुढील नेतृत्वाबाबत उत्सुकता वाढली आहे. वाडा तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी साक्षी अगिवले, माजी नगरसेविका विशाखा पाटील, सोयब शेख, मोहम्मद अमीन धोने, कीर्ती मोकाशी, संदीप कराळे, अरुण पाटील व सविता जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी दिलीप पाटील यांच्यासह राजीनामा दिला. दिलीप पाटील यांच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पाटील यांनी काँग्रेस कमिटीच्या वाडा तालुका अध्यक्ष पदाचा स्वखुशीने राजीनामा दिल्याचे सांगून कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले.वाडा नगरपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवारांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचेही पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

## कोणे येथील भगवान पुष्पदंत कंपनीला भीषण आग; पती-पत्नी दोघे जखमी



**वाडा:वार्ताहर**

वाडा तालुक्यातील कोणे परिसरात बुधवारी (दि.१९) सकाळच्या सुमारास भगवान पुष्पदंत कंपनीत अचानक भीषण आग लागून संपूर्ण कंपनी भस्मसात झाली. सकाळी अंदाजे दहा वाजताच्या दरम्यान ही घटना घडली असून परिसरात काही क्षणांतच धुराचे प्रचंड लोट पसरले. ही कंपनी फोमपासून गाद्या तयार करणारी असल्याने आग काही क्षणांतच भडकली. फोम अत्यंत ज्वलनशील असल्याने आगीचा फैलाव रोखणे अवघड झाले. आगीदरम्यान मशीनवर काम करणारे राणी रावत (वय ३०) व अजय रावत (वय ३५) हे दोघे पती-पत्नी अचानक झालेल्या स्फोटात गंभीररित्या जखमी झाले. राणी रावत हिला तातडीने वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत. अजय रावत हा गंभीर जखमी असल्याने त्याला पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनास्थळी वाडा पोलीस प्रशासन तसेच वाडा नगरपंचायतीच्या अग्निशामक दलाने तत्काळ धाव घेऊन आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मोठ्या आगीमुळे कंपनीचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून वाडा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नायगावमध्ये सराफा दुकानात भिंतीला भगदाड पाडून चोरीचा प्रयत्न सायरन वाजल्याने फसला

**वसई : वार्ताहर**



वसई विरार शहरात एकामागून एक चोरीच्या घटना समोर येत आहे. घरात तसेच दुकानात शिरून दिवसाढवळ्या चोरटे मौल्यवान वस्तू गायब करत असल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. अशातच एका सराफाच्या दुकानात भिंतीला भगदाड पाडून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. नायगाव पूर्वेच्या रश्मी फेज येथे महालक्ष्मी ज्वेलर्सचे दुकान आहे. या दुकानात १५ नोव्हेंबर रोजी भिंतीला भगदाड पाडून आत शिरून चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. गॅस कटरच्या साहाय्याने तिजोरी उघडत असताना जोरात सायरन वाजला त्यामुळे चोरट्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. सराफाने दिलेल्या तक्रारीवरून नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी मिळाली माहितीच्या आधारे नायगाव पोलिसांनी तपास करून तीन जणांना अटक केली आहे. यात विजय बन्सराज यादव (२५) अमोल देवसीचाई गोहील (३२) सचिन मेघराज सिंग (३३) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. अमोल गोहिल या आरोपीवर बोरिवली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय कदम, सहायक पोलीस निरीक्षक गणेश केकान, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे, शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, चेतन ठाकरे, सचिन खंताळ, जयवंत खंडची, अशोक पाटील, अमोल बरडे व त्यांच्या पथकाने केली आहे. तिघे आरोपी ही गॅस कटर व अन्य साहित्य घेऊन चोरी करण्याच्या उद्देशाने आले होते. मात्र सराफाने आपल्या दागिन्यांच्या दुकानात आपत्कालीन परिस्थितीत अलर्ट मिळण्यासाठी सायरन बसविला आहे. त्यामुळे तिजोरी उघडत असताना जोर जोराने सायरन वाजू लागला. त्यामुळे तेथून चोरट्यांनी पळ काढला. दुकानदाराला याची माहिती मिळताच त्याने ११२ या क्रमांकावर संपर्क करून पोलिसांना माहिती दिली. दुकानात लाखोचा मुद्देमाल होता जर सायरन वाजला नसता तर मोठी घरफोडी झाली असती, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांनी दिली आहे. वसई विरार भागात अनेकदा दागिन्यांची दुकाने फोडून चोरी करण्याच्या घटना समोर येत असतात. आतापर्यंत घडलेल्या बहुतांश घटनांमध्ये लाखोंचा मुद्देमाल चोरी झाला आहे. अशा घटना नियंत्रणात आणण्यासाठी सराफा दुकानांच्या बाह्य सुरक्षेसोबतच जर सायरनसारखी यंत्रणा बसविली तर घडणाऱ्या अनुचित प्रकाराला आळा घालता येणार आहे.

# अंबरनाथ मध्ये उडान पुलावर भीषण अपघात



**अंबरनाथ : वार्ताहर**

अंबरनाथ येथील पूर्वे-पश्चिम जोडणाऱ्या उडान पुलावर भीषण अपघात घडला आहे. त्या मध्ये चार जणांचा दुर्दैवी मृत्यू तर तीन जख्मी, असे सांगण्यात येते. अंबरनाथ येथील उडान पुलावर घडली घटना. शिवसेना उमेदवार किरण चौबे प्रचाराला जात होत्या. ह्या पुर्वेकडूनन पश्चिमेला कारणी प्रचाराला जात अस्था प्रथमथा कार वरील ड्रायवचे नियंत्रण सुठल्या मुळे हा अपघात झाला अस सांगण्यात येत आहे. कारची धडक एवढी भयानक होती की, अक्षरश्या एक बाईक स्वार कार च्या धडकेने पुलावरण खाली कोसळल्या गेले. घडलेला प्रकार सी.सी. टीव्ही. मध्ये चित्रित झाला आहे. कारणी दोन ते तीन मोटारसायकला धडक देत सुरक्षा कठडयाला धडकली. कारच्या धडकेने मोटारसायकल व कारचा चेंदा झाला आहे. कारचालक आणि मोठारसायक स्वार असे चार जण मृत्यू पावले असून तीन गंभीर जखमी आहे असे सांगण्याक्त येते. पुढील तपास अंबरनाथ पोलीस करीत आहे.

24 TO 30 NOVEMER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/22/2025 8:51 PM Page 1



# वाडा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**वाडा : वार्ताहर**

पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा आणि शहराच्या सुशोभीकरणासाठी राज्य सरकारकडून पुरेसा निधी देण्यात येईल, तसेच वाडा शहराच्या सर्वांगीण विकासाचा वेग कोणत्याही परिस्थितीत कमी होऊ देणार नाही, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाड्यातील प्रचार सभेत दिले. वाडा नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या शिवसेनेच्या (शिंदे गट) भव्य प्रचार सभेत ते बोलत होते. नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेच्या हेमांगी पाटील तर नगरसेवक पदासाठी सतरा अधिकृत उमेदवार रिंगणात असून त्यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री शिंदे यांची उपस्थिती मोठी दिमाखदार होती. सभेला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. यावेळी महिलांच्या कल्याणाशी निगडित सरकारी योजनांमध्ये कोणताही अडथळा येऊ देणार नाही, असे सांगताना शिंदे यांनी विशेषतः म्हटले की, जोपर्यंत एकनाथ शिंदे आहे, तोपर्यंत माझ्या लाडक्या बहिणींचे पैसे बंद होणार नाहीत. त्यामुळे महिलांकडून टाळ्यांचा कडकडाट झाला. वाडा शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता पाणीपुरवठ्याचे शाश्वत समाधान, प्रमुख रस्त्यांचे मजबुतीकरण, आरोग्य सुविधा उभारणी, वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा, तसेच चौक, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्यीकरण या प्राधान्य प्रकल्पांसाठी राज्यस्तरावरून विशेष लक्ष देऊ, असेही त्यांनी सांगितले. शिंदे म्हणाले की, वाडा तालुक्याच्या विकासात शिवसेना (शिंदे गट) सातत्याने काम करत आहे आणि नागरिकांनी शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करून दिल्यास विकासाचा वेग आणखी वाढेल. याप्रसंगी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दिलीप पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला. प्रचार सभेदरम्यान पक्षाचे उमेदवार, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवारांनीही या वेळी नागरिकांशी संवाद साधत आपल्या कार्याची रूपरेषा मांडली. वाडा नगरपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेनेचा प्रचार जोरदार होत असून, शिंदे यांच्या भेटीमुळे निवडणूक आणखी रंगतदार झाली आहे.

# भाजपाच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी जिद्दीने काम करावे – जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील



**रेणापूर : वार्ताहर**

शहरात कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाली. नगरपंचायतीच्या निवडणुकीत भाजपाचा पुन्हा झेंडा फडकणार असून येत्या काळात मराठवाड्यात रेणापूर विकासाचे मॉडेल शहर म्हणून पुढे आल्याशिवाय राहणार नाही तेव्हा भाजपाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करून बहुमतासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान भाजपाचे जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरूमकर यांनी रेणापूर येथे बोलताना केले. रेणापूर नगरपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे सर्व उमेदवार, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रेणापूर येथे बुधवारी झाली या बैठकीस जिल्हा निवडणूक प्रमुख आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, चिटणीस दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडलाचे अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, प्रताप पाटील, सुरज शिंदे, उद्धव काळे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव आकनगिरे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे व शहराध्यक्ष अच्युत कातळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रमेशआप्पा कराड यांना विधानसभेत पाठवून मतदारांनी लातूर ग्रामीण मतदार संघाला नवी प्रतिष्ठा मिळवून दिली असल्याचे सांगून यावेळी बोलताना बस्वराज पाटील म्हणाले की, रमेशआप्पा यांनी लोकहितासाठी सातत्याने धाडस केले असून त्यांच्या नेतृत्वात रेणापूर शहरासह संपूर्ण मतदारसंघात विकासाचा डोंगर उभा केला आहे. केलेल्या कामाच्या आधारावर आपला विजय निश्चित असून रेणापूर भाजपाचा प्रतिष्ठेचा गड असल्याने सर्वांनी बहुमतासाठी प्रयत्न करून रमेशआप्पांची मान उंचवावी असे आवाहन केले. यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, देशमुखांना जनतेने भरभरून दिले अनेक पदे त्यांच्याकडे असताना त्यांनी काय दिले? ...पान ४ वर

# वसई तहसीलदार कार्यालयात निवडणुकीसाठी मतदान यंत्रांची तपासणी प्रक्रिया सुरू



**वसई : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यात सध्या विविध पंचायत समितींच्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. सोमवार १३ ऑक्टोबर रोजी या निवडणुकांसाठी विविध पंचायत समिती क्षेत्रातील आरक्षण सोडत काढण्यात आली होती. यामुळे आता जिल्ह्यात राजकीय घडामोडींना वेग येणार आहे. एकीकडे राजकीय पक्षांची लगीन घाई सुरू असताना निवडणूक यंत्रणा आपल्या कामाला लागलेली आहे. वसई तहसीलदार कार्यालयात मंगळवारी मतदान मोजणी यंत्राची तपासणी करण्यात आली. यावेळी निवासी नायब तहसीलदार राजाराम देवकाते, नायब तहसीलदार शशिकांत नाचण यांच्या निरीक्षणाखाली कर्मचाऱ्यांनी सदर यंत्रे तपासली. यावेळी उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी पाहणी केली. १२० कंट्रोल यूनिट मशीन्स व २४० बेलर्ड यूनिट मशीन्स अशी ३६० यंत्रे तपासण्यात आली मध्य प्रदेश येथून काही दिवसांपूर्वीच सदर मतदान यंत्रे वसई तहसीलदार कार्यालयात आणण्यात आली होती. यातील नादुरुस्त यंत्रे दुरुस्तीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती मतदान विभागाने दिली. यापुढील टप्प्यात सदर मतदान ...पान ४ वर

# आयएमएच्या राज्य उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण बरमदे यांची निवड



**लातूर : वार्ताहर**

लातूर येथील ख्यातनाम स्त्री रोग, वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बलभीमराव बरमदे यांची आयएमएच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी केली गेली आहे. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. कल्याण बरमदे यांच्या या निवडीचे स्वागत होत आहे. सोलापूर येथे आयएमएच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते. यावेळी सन्माननिय अतिथी म्हणून मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. होजी कपाडिया, राष्ट्रीय सहसचिव डॉ. वसंत लुंगे, आयएमए महाराष्ट्राचे मावळते अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांची उपस्थिती होती. आयएमएच्या अध्यक्षपदी डॉ. संतोष कुलकर्णी यांची तर उपाध्यक्षपदी डॉ. कल्याण ...पान ४ वर

# निलंगा नगर परिषदेची निवडणूक लातूर विरुद्ध निलंगा नाही तर सामान्य निलंगेकर व त्यांच्या प्रश्नांची आहे - आ.अमित देशमुख



**निलंगा : वार्ताहर**

निलंगा नगर परिषदेची ही निवडणूक लातूर विरुद्ध निलंगा किंवा देशमुख विरुद्ध निलंगेकर अशी नाही तर ती सामान्य निलंगेकरांची आणि त्यांच्या प्रश्नाची आहे, त्यांचे हे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे, त्यामुळे भाजपच्या भूलथापांना थारा न देता काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले. यावेळी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे, पक्ष निरीक्षक विजय देशमुख, शहर काँग्रेसचे अध्यक्ष अजित नाईकवाडे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, अरविंद भातंबरे व इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

निलंगा नगर परिषदेची निवडणूक काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने लढत आहे. नगराध्यक्ष पद आणि नगरसेवकांसाठी उमेदवारांची निवड करताना सर्वसहमतीने, सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जनतेच्या प्रश्नाला न्याय देत निलंगा शहराच्या सर्वांगीण ...पान ४ वर

# वसईतील भूमिपुत्र संघटीत होणे काळाची गरज –मिलिंद खानोलकर



**वसई : वार्ताहर**

वसईमध्ये दिवसेंदिवस पाणी, रस्ते, वीज यांसारख्या मूलभूत गरजांचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत चालला आहे. टॉवर संस्कृतीमुळे भूमिपुत्र अल्पसंख्यांक बनले आहेत. राजकीय पक्ष याकडे फारसे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे वसईतील स्थानिक भूमिपुत्रांनी संघटीत होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मिलिंद खानोलकर यांनी १९ नोव्हेंबर २०२५ रोजी पांचाळ समाज हॉल, आक्टन, वसई रोड येथे झालेल्या भूमिपुत्रांच्या सभेत केले. या सभेसाठी मिलिंद खानोलकर, डॉमणिका डाबरे, मॅक्सवेल रोज, मॅकेन्सी डाबरे, फादर मायकलजी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मॅकेन्सी डाबरे यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी भूमिपुत्रांनी संघटीत होणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्यासाठी आम्ही वसईतील जागरूक नागरिकांना घेऊन संघटना बांधत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉमणिका डाबरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आम्ही गावागावात जाऊन लोकांना संघटनेत सामील होण्याचे आव्हान करणार आहोत. तसेच तरुण– ...पान ४ वर

# 'समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत मोखाडा तालुक्यातील कामांची प्रगती तपासणी




**पालघर : वार्ताहर**

मोखाडा तालुक्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत विविध विकासकामांची प्रगती तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी आज केली. बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत अशोक पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारस्कर प्रभारी गटविकास अधिकारी डॉ.भाऊसाहेब चतर तसेच तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते यांनी डिसेंबरअखेर सर्व अपूर्ण घरकुल पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी देखील प्रलंबित कामांना गती देऊन तालुक्यातील विकास उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना केल्या. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी योजनांच्या शिस्तबद्ध अंमलबजावणीवर भर देत अधिकारी-कर्मचाऱ्यांना नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याचे आवाहन केले. प्रधानमंत्री जनमन योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना यांसह विविध गृहयोजनांचा प्रगती आढावा या बैठकीत घेण्यात आला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा उमेद अंतर्गत सर्व महिलांचा स्वयं-साहाय्य गटांमध्ये समावेश व्हावा, कोणतीही महिला गटाबाहेर राहू नये यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

सार्वजनिक शौचालय प्रकल्पांची पूर्तता आणि मनरेगा अंतर्गत चालू असलेल्या कामांचा आढावा उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारस्कर यांनी घेतला. मोखाडा तालुक्यातील पाणीटंचाईच्या समस्येवर विशेष भर देत, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी वेळेत आणि परिणामकारकरीत्या होण्याचे महत्त्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अधोरेखित केले. तसेच 'समृद्ध पंचायत राज अभियानात तालुक्याने उल्लेखनीय स्थान मिळवावे' यासाठी अधिकाऱ्यांना प्रेरणा दिली. बैठकीच्या आधी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील यांनी ग्रामपंचायत विभागाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीनंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन घरकुलांची पाहणी केली व लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच मनरेगा अंतर्गत तुळ्याचा पाडा येथे ...पान ४ वर

# वसईत श्री मुत्तप्पण वेल्लाटम व श्री कालभैरव महापूजेचे आयोजन

**वसई : वार्ताहर**




ओम नगर, वसई (प.) परिसरात येत्या रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी भक्तिभावाने नटलेला एक भव्य धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री मुत्तप्पण वेल्लाटम महापूजा आणि श्री कालभैरव महापूजा या दोन महत्त्वपूर्ण महापुजांचा मोठा लाभ भाविकांना मिळणार आहे. हा भक्ती सोहळा वसईत ओम नगर मैदानात पार पडणार असून भाविकांसाठी दर्शनाची विशेष मोकळी व्यवस्था करण्यात आली आहे. सायंकाळी ३.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत दर्शनाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. विविध धार्मिक विधी, मंत्रोच्चार व आरतींनी संपूर्ण परिसर भक्तिमय होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक केरळ प्रकोष्ट, भाजपा महाराष्ट्र प्रदेश संयोजक उत्तम कुमार यांनी समस्त वसईकरांना आमंत्रित केले आहे. या पवित्र पुजांमुळे भक्तांना मन:शांती, सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक समाधान लाभेल, असेही उत्तम कुमार यांनी सांगितले. वसईतील भक्तजनांसाठी हा एक आध्यात्मिक आनंदाचा सोहळा ठरणार असून ...पान ४ वर

### नालासोपाऱ्यात बहुजन विकास आघाडीचा भव्य कार्यकर्ता मेळावा

# क्षितिज ठाकूर यांनी सत्ताधारी पक्षावर जोरदार हल्लाबोल करत खुले आव्हान दिले




**नालासोपारा : वार्ताहर**

बहुजन विकास आघाडीच्या तुळींज-अचोले-मोरेगाव विभागातील कार्यकर्त्यांचा एक भव्य मेळावा शनिवारी सायंकाळी ५ वाजता तुळींज रोड येथील के.एम.पी.डी. विद्यालय (नाना पाटील विद्यालय) येथे आयोजित करण्यात आला होता. ९, १०, १५, १६, १७, २१ आणि २२ विभागातील कार्यकर्त्यांच्या मोठ्या संख्येने उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात पक्षाची एकता आणि उत्साह दिसून आला. दिल्ली बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली, ज्यात बहुजन विकास आघाडीचे माजी महापौर राजेश रोडे, माजी अध्यक्ष अब्दुल हक पटेल आणि माजी नगरसेवक प्रकाश चौधरी यांचा समावेश होता. उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळले. माजी अध्यक्ष निलेश देशमुख यांनी मंचाचे सुयोग्य संचालन केले. कार्यक्रमात माजी आमदार हितेंद्र ठाकूर, माजी आमदार क्षितिज हितेंद्र ठाकूर, माजी उपमहापौर उमेश नाईक, माजी अध्यक्ष भरत मकवाना, मनीष जोशी, राजेश पांडे इत्यादी प्रमुख उपस्थित होते. आयोजक बीव्हीआयए नालासोपारा (पूर्व) च्या वतीने सर्व कामगारांचे कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल आभार मानण्यात आले. या मेळाव्यात आगामी निवडणुकीच्या तयारीसाठी विभागातील मुख्य समस्या (पाणी, वीज, रस्ते, गटार इत्यादी) बाबत कामगारांच्या तक्रारी ...पान ४ वर

# वसई तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणामधील संविधानाची कोनशिला उद्घाटनापूर्वीच फुटली

**वसई : वार्ताहर**

वसई तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणामध्ये संविधान कोनशिला लावण्याची तजवीज सुरू आहे भव्य स्वरूपात संविधानाची प्रत लावण्यात येत असताना कोनशिलाचा दगड तुटल्यामुळे या बांधकामाच्या कामाचा दर्जा स्पष्ट झाला असल्याने संताप व्यक्त होत आहे.

अधिक माहितीनुसार वसई तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणामध्ये संविधानाची प्रत लावण्यात येणार आहे. त्यासाठी मागील काही दिवसांपासून हे बांधकाम सुरू होतं. याबाबतच्या कोणशीला मागवण्यात आल्या होत्या. बांधकाम कामगारांच्या हलगर्जीपणामुळे ही कोणाशीला तुटली सदरची कोण शीला तुटलेल्या स्वरूपात लावू नये म्हणून काही सजग नागरिकांनी तहसीलदार वसई यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. विशेष म्हणजे हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या संविधानाच्या प्रतीची सुरक्षितता तसेच रखरखाव याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. २६ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'संविधान दिवस' म्हणून साजरा केला जातो, जो नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. आगामी याच दिवशी सदर कोण शिलेचे उद्घाटन आयोजित करण्यात आले होते परंतु घडलेल्या घटनेमुळे हे काम विहित मुदतीत होण्याबाबत शंका निर्माण झालेली आहे. सदर ठेकेदाराला याबाबत सूचना देण्यात आल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार राजाराम देवकाते यांनी दिली.

